शनिवार, १० जून २०२३

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक


⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६९

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 10 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-269 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5


हलक्या पावसाच्या सरी आणि वादळी वारे... त्यातच ढगांनी व्यापलेल्या सूर्याच्या रंगछटा... असे मनोहारी दृश्य निसर्गाने आकाशात साकारले होते. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# तर तुमचा दाभोळकर करू

## राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. तुमचा दाभोळकर होणार, असे ट्वीट करत ही धमकी देण्यात आली. यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेत याबाबत तक्रार दिली. माध्यमांशी बोलताना शरद पवार म्हणाले की, प्रत्येक नागरिकाला प्रत्येक प्रश्नावर मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. कुणी धमक्या देऊन कुणाचा आवाज बंद करू शकेल असे वाटत असेल, तर तो त्यांचा गैरसमज आहे. याची जबाबदारी महाराष्ट्र प्रशासनावर आहे.**



पुढे बोलताना पवार म्हणाले की, महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था सांभळणाऱ्या पोलीस दलाच्या कर्तृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे त्याची चिंता मी करत नाही. ज्यांच्या हातात राज्याची सूत्रे आहेत त्यांना आपली जबाबदारी टाळता येणार नाही, असेही शरद पवारांनी नमूद केले.

महाराष्ट्राच्या राजकारणाला मोठी परंपरा आहे. आमचे राजकीय पातळीवर मतभेद असले तरी वैयक्तिक पातळीवर कोणतेही मनभेद नाहीत. सोशल मीडियावर व्यक्त होत असताना कोणत्याही नेत्याला धमकावणे किंवा सभ्यतेच्या मर्यादा ओलांडणे ही बाब खपवून घेतली जाणार नाही. अशा प्रकरणात पोलीस नक्कीच कायदेशीर कारवाई करतील, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



**धमकी देणारा भाजपा कार्यकर्ता :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना ठार मारण्याची धमकी मिळाल्यानंतर राजकीय वातावरण ढवळून निघाले असतानाच त्यांना धमकी देणारा हा अमरावतीतील भाजपाचा कार्यकर्ता असल्याची माहिती समोर आली आहे. सौरभ पिंपळकर नावाच्या तरुणाने ट्विटरवरून पवारांना धमकी दिली. तेव्हापासून सौरभ पिंपळकरचा पोलीस शोध घेत आहेत. शहरातील साईनगर भागात राहणारा २६ वर्षीय सौरभ हा भाजपाचा कार्यकर्ता आहे. त्याच्या ट्विटर अकाउंटवर त्याने 'आय ॲम बीजेपी ॲक्टिव्हिस्ट, आय हेट सेक्यूलेरिझम' असे लिहून ठेवले आहे. अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सौरभ पिंपळकरच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. गाडगेनगर पोलिसांचे पथक त्याच्या शोधात आहे. हे पथक त्याच्या घरीही जाऊन आले, पण तो आढळून आला नाही, त्याचा मोबाईलदेखील बंद आहे.

**राज्यात कायदा सुव्यवस्था राहिली नाही :** मागील काही दिवसांत राज्याच्या वेगवेगळ्या भागातून दररोज हत्या, बलात्कार, दंगली, विरोधकांना धमक्या, विरोधी पक्षाच्या नेत्यांवर हल्ले होत आहेत. राज्याची राजधानी आणि सुरक्षित शहर असणाऱ्या मुंबई आणि परिसरात दररोज बलात्कार आणि हत्येच्या घटना घडत आहेत. आता विरोधी पक्षाच्या नेत्यांना खुलेआम जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत? राज्यात कायदा सुव्यवस्था राहिली नसून शिंदे फडणवीसांचे जंगलराज सुरु आहे असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. सरकारच्या आशिर्वादाने सत्ताधारी पक्षांकडून राज्यात धार्मिक तेढ निर्माण केली जात असून जाणीवपूर्वक महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न सुरु आहे. या दंगेखोरांवर कठोर कारवाई करण्याऐवजी पोलीस मात्र होऊन पहात बसले आहेत तर गुंड आणि समाजकंटक दररोज महाराष्ट्राच्या अब्रूची लक्तरे काढत आहेत.

# मुख्यमंत्री शिंदे काश्मीर दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात गेल्यावर्षी अभूतपूर्व अशी बंडाळी निर्माण झाली होती. एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह शिवसेनेत बंड केले. त्यानंतर भाजपाबरोबर जात एकनाथ शिंदे यांनी सत्ता स्थापन केली. या घटनेला एक वर्ष पूर्ण होणार आहेत. अशातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तीन दिवस रजेवर गेल्याचे सांगितले जात आहे. गुरूवारी एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब वैष्णो देवीचे दर्शन घेतले. गुरूवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहकुटुंब गुरूवारी जम्मू-काश्मीरमध्ये दाखल झाले. तेथून विशेष हेलिकॉप्टरच्या मदतीने जम्मूतून सीधे पंछी हेलिपॅड येथे ३ वाजता पोहचले. येथे वैष्णो देवी मंदिर समितीचे अधिकारी नवनीत सिंह, अजय सलान आणि पोलीस अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. त्यानंतर ३.४५ वाजता ते वैष्णो देवीच्या मंदिरात पोहाचले. येथे एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब वैष्णव देवीचे दर्शन घेतले.वैष्णो देवी मंदिर समितीने पवित्र चुनरी भेट देऊन मुख्यमंत्र्यांचा सन्मान केला. सायंकाळी ५.३० वाजता वैष्णो देवी भवन येथून हेलिपॅडवर पोहचत विशेष हेलिकॉप्टच्या मदतीने जम्मूला रवाना झाले.



# ज्येष्ठ नागरिक, पन्नास टक्के सवलतीत लालपरीचा श्वास गुदमरला

## ज्येष्ठांसह, महिलांची तुफान गर्दी, एसटी बसेस वाढवण्याची प्रवाशांची मागणी


आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

धाराशिव : महाराष्ट्र राज्य शासनाने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेसच्या तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केल्यानंतर,१७ मार्च २०२३ पासून एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमधून महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेला एसटी महामंडळाच्या स्तरावर महिला सन्मान योजना म्हणून ओळखले जात आहे. या योजनेची तिकीट दरातील उर्वरित रक्कम शासनाकडून महामंडळाला मिळणार आहे. तर 2022मध्येच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवीनिमित्ताने राज्य शासनाने एसटी बसेस मध्ये प्रवास करताना 75 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना विनामूल्य प्रवास सुरु केला आहे. त्याचप्रमाणे ज्यांचे वय हे 65 ते 75 दरम्यान आहे अशा नागरिकांना 50 टक्के सवलत ही देण्यात येत आहे. या योजनेमुळे ज्येष्ठ नागरिक मोठ्या उत्साहाने मोफत प्रवास करत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयाची सर्व ज्येष्ठ नागरिकांकडून स्वागत करण्यात येतं आहे. मात्र या दोन्ही योजनेमुळे प्रवास करणाऱ्यांची प्रचंड संख्या वाढल्याने एसटी बस सध्या हाऊसफुल होऊन रस्त्यावरून वाहत आहेत. अगोदरच्याच बस स्थानकामध्ये बसेस हाऊसफुल होऊन येत असल्याने पुढील बस स्थानकात नवीन प्रवाशांना एसटीत उभा राहिला सुद्धा जागा मिळत नाही. तर इकडे अतिशय जिर्ण झालेली, मोडकळीस आलेली लाल परी तिच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी संख्या घेऊन फेऱ्या मारत असल्याने, वारंवार वाटेतच बसेस बंद पडणे, अशा दैनंदिन घटनेमुळे रोजच्या चाकरमान्यांचे खूप मोठे हाल होत आहेत. राज्य शासनाच्या एसटी प्रवासामध्ये महिलांना 50% सूट व ज्येष्ठांचा केलेला सन्मान या निर्णयाने बहुतांश आगाराच्या रिकाम्या फेऱ्या करणाऱ्या एसटी बसेस आज हाउसफुल होऊन फेऱ्या मारत आहे. त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय, चालक वाहकाला होणारा त्रास, लवकरच शाळा सुरू होत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांची ये-जा वाढणार आहे. तर आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची संख्या या सर्व ह्या बाबींकडे त्वरित लक्ष देऊन परिवहन खाते स्वतः मुख्यमंत्री साहेबांकडे असल्याने त्यांनी प्रत्येक आगारांमध्ये नवीन बसेसची संख्या लवकरच वाढावी असेच नागरिकांमधून बोलले जात आहे.



प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन परिवहन मंत्र्यांनी एस .टी .बसेसची संख्या वाढवणे गरजेचे आहे . **चेतना खिरवाडकर,विभाग नियंत्रक,धाराशिव .**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

भारताच्या विविध भागातील हजारो लोकगीते, लोककथा, प्राचीन चित्रकला, नाट्यकला, नृत्यकला इत्यादींवर आपली अमीट छाप असणारे हे व्यक्तिमत्व ! लावणी, होरी, कजरी, गवळण आदी काव्यप्रकार तसेच अभिजात संगीतातील राग, ख्याल, ठुमरी या सगळ्यांमधील बराच भाग श्रीकृष्ण चरित्राने व त्याच्या कथांनी व्यापलेला आहे. जसे काव्य,साहित्य प्रकारात नवरस असतात तसा या सगळ्या कला, साहित्यातील ज्याला आपण श्रीकृष्ण रस म्हणूया, तो जर बाजूला काढला तर सगळेच निरस होऊन जाईल. श्रीकृष्ण चरित्राने आम्हाला युगानुयुगे मोहिनी घातली आहे, मार्गदर्शन केले आहे म्हणूनच तो युगपुरुष आहे, युगंधर आहे. काळावर आपली छाप उमटवून काळाचा प्रवाह बदलणारे काही महापुरुष असतात, तसाच हा योगेश्वर कृष्ण. त्याने त्याच्या काळातील कंसासह अनेक असुरांचा विनाश केला. दुष्ट प्रवृत्ती नष्ट केल्या. असे करताना त्याने अनेक राज्ये जिंकली. पण एकाही राज्याचा मोह त्याला पडला नाही. वेगवेगळी राज्ये वेगवेगळ्या सुपात्र अशा व्यक्तींच्या ताब्यात सोपवून तो नामनिराळा झाला हे त्याचे मोठेपण आहे. श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात काही चमत्कार जरूर केले असतील पण त्याचे चरित्र हे महामानवाचे चरित्र आहे. महाभारतातील घटनांचा बारकाईने अभ्यास केला असता श्रीकृष्णाने आपल्या वागणुकीने निरनिराळे आदर्शच प्रस्थापित केले हे आपल्याला दिसून येईल. त्याला त्या काळातील आद्य समाजसुधारकही या दृष्टीने म्हणता येईल. कौरव पांडव युद्धात त्याने पांडवांची बाजू घेतली याचे कारण म्हणजे कौरव त्याचे शत्रू होते म्हणून नव्हे तर कौरव अन्यायाने वागणारे होते म्हणून. पांडवांचा पक्ष घेऊन त्याने सत्य, न्याय, सदाचार यासारख्या नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना केली. गाई चारणे, गोपाळांशी मैत्री करणे, त्यांच्यासमवेत राहून सामाजिक समतेचे तत्व त्याने प्रस्थापित केले. ' माखनचोर ' म्हटल्या गेलेल्या कृष्णाने सामान्यांच्या मुखात दही, दूध, लोणी पडावे या उद्देशाने हे घडवून आणले.



## आनंदी पहाट

## विचार आणि भूमिका चांगल्या असाव्यात

आधुनिक केसरी

आपण अनेकदा घडून गेलेल्या घडामोडी आणि घटना ह्यांच्यातच गुरफटलेले असतो. त्या लवकर विसरत नाहीत. त्यांतही नकारात्मक गोष्टी आपल्याला अधिकच सतावत राहतात, दुःखी करतात. आपल्या विचारांत सकारात्मकता आणल्याने येणारा अनुभव आणि त्याद्वारे मिळणारा आनंद निश्चितच आंतरिक समाधान आणि मानसिक शांती देणारा असतो. प्रत्येक बाबीकडे खिलाडू वृत्तीने बघितले, आनंदाने प्राप्त परिस्थितीचा स्वीकार केला तर आपल्या जीवनशैलीत नक्कीच बदल घडून येऊ शकतात. चांगली भूमिका, चांगली ध्येय आणि चांगले विचार असणारे लोक नेहमी आठवणीत राहतात - मनातही, शब्दातही आणि आयुष्यातही. ह्या सकारात्मक विचारांचा उपयोग आपल्याला होत राहतो. जेवणातल्या मीठाप्रमाणे जीवनात चव आणणाऱ्यांपैकी आणि जीवनाची गोडी वाढवणाऱ्यापैकी आपण एक असावे आणि आपल्या जीवनाला सार्थकता प्राप्त करून घ्यावी, असा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला सुरुवात केली तर एकूणच वातावरणात सकारात्मकता, जाज्वल्य, आश्वासकता निर्माण झाल्याची प्रचीती येऊ लागते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपल्या विचारांत आणि आचारांत फारसा बदल होतोच असे नाही. दोन किंवा त्यांपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये मतभिन्नता असणे स्वाभाविक आणि नैसर्गिक असते. पण मतभेद होत राहणे हे सकारात्मक सहजीवनास बाधक आणि घातक ठरू शकतात, ह्याचे भान राहणे आवश्यक असते. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची

प्रचीती आल्याशिवाय मिळत असतो. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**भोग प्रारब्धाचा | खेळ सारा ||**
प्रेमाचे माहेर | असता अंतरी ||
कैसा शोक करी | इतरांचा |१||
मार्तंडाचे ठायी | तमास ना थारा ||
संतांच्या विचारा | तैसे मोल ||२||
चिंता मुक्तीसाठी | चिंतनी रमावे ||
आत्ममग्न व्हावे | एकांतात ||३||
आपुलीया दुःखा | आपण सहावे ||
चिंतामणी व्हावे | आपणचि ||४||
कुणा न आकळे | सारिपाट त्याचा ||
भोग प्रारब्धाचा | खेळ सारा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**अधरोष्ठौ च ते मातः हास्येन लसितौ ननु|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| १७ || हे माते, मधुर हसण्याने तुझे
अधारोष्ठ चकाकत आहेत.
अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या
शांतीसाठी मी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**अन्तर त्याग विरक्त हैं,
\बाहर सकल पसार ।
पद्म पत्र जल संग रहें, वे निर्लेप संसार
।।०२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम
अध्याय) ०४/१०/०२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
गृहस्थ संत अंतरातून त्याग करून विरक्त असतात आणि बाहेरून समस्त व्यवहार संबंध ठेवून त्याचा विस्तार करतात. ते जलातील कमळाच्या पानाप्रमाणे संग राहूनही संसारात असंग, निर्लेप असतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी

मूळमायेत विश्वाचे बीज पेरलेले असते. मूळमायेतून माया उदय पावते. तिच्यातून गुण प्रगट होतात. त्यापैकी त्रिगुणापासून पंचभूते उदय पावतात. पंचभूतात्मक मिश्रणातुन आपण पहातो ते विश्व तयार होते. परब्रम्हामध्ये मूळमाया झाली, तिच्यापोटी माया जन्माला आली, मायेने त्रिगुणांना जन्म दिला.मायेपासून सत्व,रज,तम हे गुण निर्माण झाले तमोगुणापासून पंचभूते निर्माण झाली. पंचमहाभूतांच्या बाजूने विचार केला तर मूळमायेमध्ये पंचभूतांचे बीजरूपात अस्तित्व असते. पंचमहाभूते कोणती ?हे चराचर विश्व पंचमहाभूतांचे बनलेले आहे. 1 ) जे जे कठीण आणि जड आहे ते प्रुथ्वी चे लक्षण आहे. 2 ) जे जे मुलायम आणि ओले आहे ते ते पाण्याचे लक्षण समजावे. 3 ) जे जे गरम आणि प्रकाशयुक्त आहे ते ते तेजाचे लक्षण समजावे. 4 ) जिवंतपणा आणि हालचाल हे वायूचे लक्षण समजावे. 5 )पोकळपणा, अवकाश आणि स्तब्धपणा हे आकाशाचे लक्षण समजावे. पंचमहाभूतांच्या अस्तित्वाची जाणीव आपल्याला वेळोवेळी होत असते. याचा सविस्तर अभ्यास आपणास करावयाचा आहे. ते श्री समर्थ कसा समजावून देतात ते पाहू. आकाश अत्यंत सुक्ष्म तर प्रुथ्वी अत्यंत स्थुल व जड असते. आकाश म्हणजे नुसता अवकाश पोकळी जी क्षितिजा पर्यन्त पोहचते. शून्यमय,पोकळ व मोकळी जागा, शुन्य म्हणजे अज्ञान, अज्ञान म्हणजे जडत्व आणि जडत्व म्हणजेच प्रुथ्वी अशी एकात्मिक जाणीव आपल्याला होते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## मी भगवंताचा आहे ही अखंड जाणीव ठेवावी

आधुनिक केसरी

आपल्याला काही हवे असे वाटले आणि ते तसे झाले नाही, म्हणजे तळमळ लागते. परंतु सर्व परमात्माच करतो आहे असे मानले, म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. आपण 'देव आहे' असे मानतो, पण आपला तो खरा विश्वास आहे का ? एकादा मनुष्य बुडायला लागला, म्हणजे दगड जरी त्याच्या हाताला लागला तरी हा आपल्याला तारील असा त्याला विश्वास वाटतो, आणि तो त्याला धरून आपणही त्याच्या बरोबर बुडतो. म्हणून म्हणतो, 'देव आहे' असा आपला खरा विश्वास नसतो, आपण नुसते तोंडाने म्हणतो एवढेच ! नाही तर आपल्याला काळजी का वाटावी ? प्रत्यक्ष देव पुढे उभा राहिला तरी आपल्या मागची काळजी आणि सुखदुःखे संपणार नाहीत. याचे कारण म्हणजे, परमेश्वरावरचा आपला विश्वासच डळमळीत असतो. वास्तविक, परमेश्वराची इच्छा प्रमाण मानल्यावर सुखदुःख मानण्याचे कारण नाही. परमेश्वर सर्वव्यापी आहे. तो जसा माझ्यात आहे, तसा दुसऱ्यातही आहे; म्हणून दुसऱ्याने काहीही केले तरी आपल्याला त्याबद्दल काही वाटण्याचे कारण नाही. तरी



अशी भावना ठेवून वागावे की, मी देवाचा आहे, तो माझा पाठिराखा आहे, आणि म्हणून काही झाले तरी मला काळजी करण्याचे कारण नाही. हे सर्व नामस्मरण केल्याने साधते. म्हणून मी आजपासून सतत नामस्मरण करीत राहणार असा निश्चय करावा, आणि त्या दृष्टीने प्रयत्न चालू ठेवावा. परमेश्वराला शरण जाऊन 'मला तसे वागण्याची बुद्धी द्यावी' म्हणून त्याची प्रार्थना करावी. मनाला पहिल्याने थोडी बळजबरी करावी लागेल. लहान मुलांना शाळेत जाण्याकरिता सुरुवातीला थोडी बळजबरी करावी लागते. मुलीला प्रथम सासरी पाठवितानाही तसेच करावे लागते. आपण थोडा तरी नियम करावा. उदाहरणार्थ, जेवायच्या आधी, रात्री निजताना, सकाळी उठताना नाम घ्यायचेच; भगवंताची आठवण करायचीच. असे केले तर ते आयुष्यात उपयोगी पडेल. प्रपंचाचा प्रयत्न आज जो चालू आहे तसाच करीत जावा, पण 'मला भगवंत हवा' असे म्हणत जावे. मनामध्ये भगवंताची आस ठेवावी, म्हणजे हळूहळू ती वाढत जाईल, आणि तिचे पर्यवसान ध्यासामध्ये होईल. समजा एखाद्या माणसाला घर बांधावयाचे आहे; 'मला घर बांधायचे आहे' असे तो म्हणत जातो, आणि त्यासाठी पैसे शिल्लक टाकतो. दागिने करायची वेळ आली तर ते नको म्हणतो, कारण पुढे घर बांधायचे आहे. हे जसे खरे, त्याचप्रमाणे 'भगवंत मला हवा आहे' असे नुसते म्हणत गेल्याने देखील मनुष्य निव्वळ प्रपंचातच गुरफटून न राहता, विषय बेताने भोगेल. खरा ध्यास लागल्यावर, ती वस्तू मिळाल्यावाचून चैन पडणारच नाही. ज्याचा भगवंतावर विश्वास, त्याला समाधान खास !

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**अगाधजलसंचारी न गर्व याति रोहितः ।
अंगोदकमात्रेण शफरी फर्फरायते ॥
सरलार्थ - खोल खोल पाण्यात संचार करणारा रोहित नावाचा मासा गर्व करीत नाही. (पण) टीचभर पाण्यात (संचार करणारी) मासोळी मात्र सारखी सुळसुळ करीत असते.
स्पष्टीकरण - भरल्या घड्याप्रमाणे ज्ञानाने परिपूर्ण असलेले पारंगत विद्वान आपल्या ज्ञानाचा गर्व मिरवीत नाहीत. पण चार पुस्तके वाचून स्वतःला शहाणपण आले असे समजणारे लोक मात्र सारखी वटवट करीत असतात. मग वेळ आली, की त्यांच्या ज्ञानाचे पितळ सहजी उघडे पडते.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १० जून २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# भूविकास बँकेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कायम सकारात्मक

## अजित पवार : महाविकास आघाडी सरकारच्या काळात अर्थसंकल्पात निर्णय झाल्याचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासात भूविकास बँकेचे योगदान मोलाचे आहे. आपल्या पूर्वजांनी स्थापन केलेली, आपण सर्वांनी वाढवलेली, भूविकास बँक अवसायनात निघाल्याने बंद करावी, लागली याचे निश्चितच दुःख आहे. मात्र शेतकऱ्यांसह भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागल्याचा आनंद अशी संमिश्र अवस्था आहे. त्यामुळे एका डोळ्यात आसू, तर, दुसऱ्या डोळ्यात हसू असल्याची भावनिक प्रतिक्रीया व्यक्त करत विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी भूविकास बँकेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कायमच सकारात्मक भूमिका घेतली, महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्याच्या अर्थसंकल्पात याबाबतचा निर्णय घेतल्याचे सांगितले. पुणे येथील अल्पबचत भवनमध्ये भूविकास बँक अवसायनात निघाल्याने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बँक कर्मचाऱ्यांना त्यांची थकीत देणी देण्याचा निर्णय घेऊन, निर्णयाची अंमलबजावणी केल्याबद्दल तत्कालिन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा सत्कार शेतकरी व भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांच्यावतीने करण्यात आला.

यावेळी आयोजित 'कृतज्ञता मेळाव्या'त सत्काराला उत्तर देताना विरोधी पक्षनेते अजित पवार बोलत होते. यावेळी माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजीत अडसूळ, सुनील साळवी, नरेंद्र सावंत, नितीन खोडदे, एम. पी. पाटील, आनंद थलवर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.


सहकार क्षेत्राच्या माध्यमातूनच माझ्या राजकीय, सामाजिक जीवनाची सुरुवात झाली, त्यामुळे सहकार क्षेत्रातल्या अडचणींची मला माहिती आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर अवघ्या पाच वर्षांनी, म्हणजे १९६५ ला स्थापन झालेल्या भूविकास बँकेने जवळपास ४५ वर्षे चांगला कारभार केला. राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले. दुर्दैवाने , आर्थिक संस्था चालवण्यासाठी जी व्यावहारिक समज आणि आर्थिक चातूर्य लागते, तिथे बँक कमी पडली. शेतकऱ्यांचा विकास हे भूविकास बँकेचे ध्येय असले तरी, ते गाठण्यासाठी आर्थिक गणिते सांभाळावी लागतात. नफा कमावणे हा उद्देश दुय्यम ठेवल्याने बँकेला फटका बसला. अशा अनेक कारणांमुळे १९९८ पासून बँकेला कर्जवितरण बंद करावे लागले. साधारण दहा वर्षांपूर्वी बँक अवसायानात निघाली. तेव्हापासून बँकेचे कर्जदार शेतकरी, बँकेचे कर्मचारी बांधव अडचणींचा सामना करत होते. शेतकऱ्यांच्या विकासात महत्वाचे योगदान असलेली, राज्याची भूविकास बँक अवसायानात निघणे, हा आपल्या सर्वांसाठी अत्यंत वाईट आणि दुःखद अनुभव होता. तेव्हापासून आतापर्यंचा काळ आपल्या सर्वांसाठी कठीण होता असेही अजित पवार म्हणाले.

महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर, उपमुख्यमंत्रीपद आणि अर्थमंत्रीपद माझ्याकडे आले. भूविकास बँकेच्या कामाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जोडला गेल्याने, तसेच, सहकार, बँकिंग क्षेत्रात काम करत असल्यामुळे, यासंदर्भातला निर्णय घेणे सोपे आणि शक्य झाले. गेल्या वर्षीचा, २०२२ - २३ च्या राज्याचा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर केला. त्यावेळी अर्थसंकल्पातच, राज्यातल्या, ३४ हजार ७८८ कर्जदार शेतकऱ्यांकडे असलेले , भूविकास बँकांचे , ९६४ कोटी १५ लाख रुपयांचे कर्ज, माफ करण्याची घोषणा आपण केली. बँक कर्मचाऱ्यांची २७५ कोटींची थकबाकी एकरकमी देण्याचा निर्णय घेतला. राज्याच्या अर्थसंकल्पातच हा निर्णय घेतल्याने आणि विधीमंडळात अर्थसंकल्प मंजूर करुन घेतला असल्याने, निधीची तरतूदही असल्याने, नंतर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने या निर्णयाची अंमलबजावणी केली. भूविकास बँकेसंदर्भात हा निर्णय पूर्ण अभ्यास करुन अर्थसंकल्पात घोषणा करण्यापूर्वी मंत्रालयात अनेकदा बैठका घेऊन कशा पद्धतीने मार्ग काढता येऊ शकतो, याचा विचार, त्यावेळचे मुख्यमंत्री उद्धवजी, सहकारमंत्री बाळासाहेब पाटील आम्ही सगळ्यांनी केला. या क्षेत्रातल्या तज्ज्ञांची , अधिकाऱ्यांची मते घेतली. त्यानंतर अर्थमंत्री म्हणून, अर्थसंकल्पात हा निर्णय जाहीर केला. त्याआधीही ऑगस्ट २०२१ मध्ये मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर या निर्णयाचे सुतोवाच आपण केले होते. भूविकास बँकांच्या जमिनींचा, इमारतींचा वापर यापुढे शासकीय योजनांसाठी करण्याचा निर्णयही त्यावेळी आपण घेतला. त्याचाही फायदा राज्याच्या विकासासाठी होणार आहे.

भूविकास बँकेचा प्रश्न सोडविल्यामुळे राज्यातल्या ३५ हजार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला तसेच भूविकास बँकेच्या अडीच हजार कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्यात येणार आहेत. मात्र आपल्या पूर्वजांनी स्थापन केलेली, आपण सर्वांनी वाढवलेली, भूविकास बँक अवसायनात निघाल्याने बंद करावी, लागली याचेही दुःख मनात आहे. बँक पडल्याचे दुःख, शेतकऱ्यांचे-तुमचे प्रश्न मार्गी लागल्याचा आनंद अशी संमिश्र अवस्था आपल्या सर्वांचीच आहे. एका डोळ्यात आसू, तर, दुसऱ्या डोळ्यात हसू, ठेवून, आपण केलेला हा सत्कार स्वीकारत असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

# प्रकाश आंबेडकरांचा सरकारला सल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. तुमचा दाभोळकर होणार, अशी धमकी ट्विटरवरून देण्यात आली आहे. यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेत याबाबत तक्रार दाखल केली. आता त्यावर राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. या प्रकरणावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांपासून ते विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्यांपर्यंत अनेक नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. यावर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीदेखील भाष्य केलं आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, शरद पवार आणि संजय राऊत यांना अशा प्रकारची धमकी येणं ही खूप गंभीर बाब आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घ्यावी. सत्ता येते आणि जाते, याच्यात सामान्य माणूस आणि कुठलाही नेता असुरक्षित होऊ नये याची दक्षता शासनाने घ्यायला हवी. राज्य सरकार ही दक्षता घेईल अशी आशा आम्ही बाळगतो. या नेत्यांच्या सुरक्षेची जबाबदारी पोलिसांची आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, पवार आणि राऊत या दोन्ही नेत्यांना पोलिसांनी सुरक्षा दिली पाहिजे. राजकीय नेते काय सांगतात, काय सांगत नाहीत यापेक्षा पोलीस खातं हे संरक्षणासाठी आहे. पोलीस खातं या दोन्ही नेत्यांना पूर्णपणे संरक्षण देईल अशी अपेक्षा बाळगतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांन प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सवाल केल्यावर ते म्हणाले, ज्येष्ठ नेते शरद पवार यांना ट्विटरवरुन आलेल्या धमकीची सरकारने गंभीर दखल घेतली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी मी स्वतः बोललो आहे. तसेच त्यांना यासंबंधी तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# काळबादेवीमधील इमारतीला भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काळबादेवी येथील एका पाच मजली इमारतीला मध्यरात्री दीडच्या सुमारास भीषण आग लागली. मुंबादेवी मंदिराजवळ ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एक जण जखमी झाला असून सकाळी सव्वाआठच्या सुमारास आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आले. काळबादेवी धनजी स्ट्रीट परिसरात एका सहा मजली इमारतीला गुरुवारी मध्यरात्री पावणेदोनच्या सुमारास भीषण आग लागली. इमारतीच्या पाचव्या मजल्यापर्यंत आग पसरली होती. दुर्घटनाग्रस्त इमारतीत सुमारे ५० ते ६० रहिवासी अडकले होते. आगीचे वृत्त समजताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आणि इमारतीत अडकलेल्या रहिवाशांना सुखरूप बाहेर काढले. बचावकार्य सुरू असताना पहिल्या व दुसऱ्या मजल्याचा काही भाग आणि जिन्याचा भाग कोसळला. अग्निशमन दलाचे जवान आग विझविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. पहाटे चार वाजता आग भडकल्यामुळे अग्निशमन दलाने क्रमांक तीनची वर्दी दिली. सकाळी आठ वाजता आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आले. या दुर्घटनेत पराग चाकणकर यांचा हात भाजला.



# निकृष्ट रस्ताप्रश्नी नीलेश चिखले यांचे ढोलताशा बडवत भीक मागो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भरवस - वाहेगांव - गोंदेगाव रस्त्याचे निकृष्ट काम सुरू असून या विरोधात सामाजिक कार्यकर्ते निलेश चिखले यांनी आवाज उठविलेला आहे. सदर कामाच्या ठिकाणी कामाची माहिती देणारा फलक नसलेने आज ( दि.०९ ) गोंदेगाव आठवडे बाजारात चिखले यांनी भीक मागो आंदोलन केले. या आंदोलनास एक रुपया भीक देऊन नागरिकांनी देखील प्रतिसाद दिला.

निफाड पूर्व भागातील भरवस - वाहेगाव - गोंदेगाव रस्ता दुरुस्तीचे काम सध्या सुरू आहे. हे काम निकृष्ट होत असल्याचा आरोप निलेश चिखले यांच्यासह नागरिकांनी यापूर्वीच करत दि. २४/०५ ला बांधकाम विभागाकडे चौकशी करण्याची मागणी केली होती. ती चौकशो प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याचे समजते. या रस्ताकाम ठिकाणी कोठेही नामफलक लावलेले नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याचा अंदाजपत्रक, कामाचे स्वरूप, ठेकेदाराचे नाव समजण्यास मार्ग नव्हता. त्यामुळे रस्त्याची चौकशी होईल तेव्हा होईल ; परंतु तत्पूर्वी कामाचे फलक लावण्याची मागणी चिखले यांनी दि. २४ जूनच्या अर्जात देखील केली होती. त्या अर्जास पंधरा दिवस उलटून गेल्यानंतर देखील फलक न लागल्याने निलेश चिखले यांनी आज ( दि. ०९ ) गोंदेगाव आठवडे बाजारात ढोल आणि ताशा वाजवत भीक मागो आंदोलन केले. नागरिकांनी देखील काटोरित पैसे टाकत या आंदोलनास पाठिंबा दिला. आगळेवेगळे आंदोलन असल्याने या आंदोलनाची चर्चा तालुक्यात रंगली होती.




भीक मागो आंदोलनात जमा झालेली रक्कम निफाड येथील बांधकाम विभागात जमा करणार आहे . या निधीतून तरी रस्ता कामाच्या ठिकाणी फलक लागतील अशी अपेक्षा आहे .
**– निलेश चिखले, सामाजिक कार्यकर्ते, गोंदेगाव .**




# जयंत पाटील आक्रमक

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. “तुमचा दाभोळकर होणार, अशी धमकी ट्वीटद्वारे शरद पवारांना दिली गेली आहे. या धमकी प्रकरणाची माहिती देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले, सौरभ पिंपळकर नावाच्या ट्वीटर अकाउंटवरून ही धमकी देण्यात आली आहे. त्याच्या ट्विटर अकाऊंटच्या बायोमध्ये भाजपाचा कार्यकर्ता असा उल्लेख आहे. पण, तो खरेच भाजपाचा कार्यकर्ता आहे का? याची माहिती नाही. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. जयंत पाटील म्हणाले, तो (शरद पवारांना धमकी देणारा) भाजपा कार्यकर्ता आहे असे तो म्हणतोय. अलिकडे ट्विटरवर असे काही लिखाण करणाऱ्यांना, अशा ट्विटर हँडल्सना मोठमोठे लोक फॉलो करतात आणि प्रोत्साहन देतात. त्यामुळे अशा प्रवृत्त्या वाढवून अशा प्रकारचे राजकारण निर्माण करण्याचा प्रयत्न राज्यात आणि देशात सुरू आहे. परंतु आपलं राज्य पुरगोमी आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र सुजाण आहे. त्यामुळे जाणीवपूर्वी हे चाळे कोण करतंय हे राज्याला आता कळू लागलंय. जयंत पाटील म्हणाले, अशा प्रवृत्तींना रोखण्यासाठी कडक उपाययोजना राबवल्या पाहिजेत. या घटनेकडे सोशल मीडियावरचे लिखाण समजून साधी किंवा हलकी कलमे लावून त्या व्यक्तीला सोडून देण्याचा प्रयत्न कृपा करून कोणीही करू नये. त्यांना शिक्षा देण्याचे प्रयोजन सरकारने करावे. शरद पवारांवर होत असलेल्या टीकेवर आणि सत्ताधाऱ्यांनी केलेली औरंगजेबाशी तुलना याबद्दल प्रश्न विचारल्यावर जयंत पाटील म्हणाले, पवार साहेब जे बोलले नाहीत, ज्याबद्दल अजिबात त्यांनी भाष्य केले नाही, अशा खोट्या बातम्या तयार करून प्रसारमाध्यमात देणे, त्यावर पुन्हा अनेकांनी बोलणे आणि मुद्दाम पवारांना लक्ष्य करणे हा प्रकार सध्या सुरू आहे. कारण पवार हे विरोधी पक्षांचे शक्तीस्थळ आहे. त्यांना नामोहरम करणे आणि राज्यातल्या युवकांना वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न या प्रवृत्तीचे लोक करत आहेत. जयंत पाटील म्हणाले, औरंगजेबाजा पुळका कोणालाच नाही, राज्यातल्या जनतेप्रमाणे आम्हा सर्वांच्या भावनाही त्याच आहेत. परंतु काही लोकांचे लोकप्रियता वाढवण्याचे प्रयत्न संपले आहेत, त्यामुळे निवडणुकांच्या आधी हे लोक या मार्गाला लागले आहेत.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# नेत्रदान- एक सर्वश्रेष्ठ दान!

आधुनिक केसरी

**मानवी जीवनात मरणोत्तर डोळेच फक्त अंधाना मदत करू शकतात. तेव्हा दृष्टी दानामुळे एक माणूस दुसऱ्या अंध माणसाचे जीवन प्रकाशमय करून त्याला सामान्य जीवन जगण्यास मदत करु शकतो. नेत्रदानाची प्रक्रिया मृत्युच्या काही तासांत- शक्यतो व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा तासांच्या आत करण्यात येते. नेत्रदानाचा निर्णय घेतलेल्या एका मृतव्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येतात. त्यामुळे त्या अंधव्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. आपल्यालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल, तर आपण आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकतो.**

नेत्रदान ही संकल्पना राबविण्याचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहीन व्यक्तींच्या दृष्टींना प्रकाशमान करु शकू. आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे.

अलीकडे दृष्टीला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. दृष्टी या शब्दावरून अलीकडे बऱ्याच प्रमाणात टोमणे मारता येतात. सरकारला दृष्टी नाही, जाणूनबुजून धृतराष्ट्राची भूमिका घेत आहे; तसेच प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांना "भावी काळात दूरदृष्टी ठेवून भावी जीवनात कोण व्हायचे आहे, हे ठरवून वाटचाल कर!" असे सतत खुणावत असतात. एकंदरित काय ? तर दृष्टी ही फार महत्त्वाची आहे. कलियुगात दानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. अवयवदान, रक्तदान, नेत्रदान, अन्नदान आदींना फार महत्त्व आहे. धनदान, अन्नदान यापेक्षा जर नेत्रदान करून एखाद्या अंधव्यक्तीला दृष्टी दिली, तर हा दाता आयुष्यात आपल्या कर्तबगारीने खुप मोठा होईल. त्याच्या हातून हे एक श्रेष्ठ समाजकार्य देखील घडेल. १० जून हा जगभर दृष्टिदान दिवस म्हणून साजरा केला जातो; कारण त्या दिनाचे औचित्य साधून दृष्टिदानाचे स्मरण राहील. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्ती आताच नेत्रपेढीत जाऊन विहित नमुन्याचा फॉर्म भरून दिला, की मरणोत्तर नेत्रदानाचे कार्य सत्कारणी लागेल. एखाद्या व्यक्तीच्या शरीराचे सर्व भाग महत्वाचे असतात, परंतु यामध्ये डोळ्यांना थोडे अधिक महत्त्व असते. डोळे ही देवाने दिलेली सर्वोत्कृष्ट अमूल्य देणगी आहे. ज्याचे डोळे नसतात त्यांच्याकडूनच त्याचे मूल्य चांगले समजू शकते. मृत्यूनंतर डोळे दान देऊन आपण कोणालाही नवीन जीवन देऊ शकतो. नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊनच दरवर्षी १० जून हा दिवस जगभर अंतरराष्ट्रीय दृष्टिदान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून लोकांना नेत्रदानाचे महत्त्व सांगून नेत्रदानाची जनजागृती केली जाते. जागतिक नेत्रदान दिनाचे उद्दिष्ट व नेत्रदानाचे महत्व या बद्दलची जनजागृती करून लोकांना किंवा त्यांच्या नातेवाईकाच्या मृत्यूनंतर डोळे दानास प्रवृत्त करणे आहे. अंधत्व ही विकासशील देशांमध्ये प्रमुख सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांपैकी मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओ अनुसार कार्निया संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टीहानी आणि अंधत्वाच्या मुख्य कारणांपैकी आहे. सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ.आर. ए.भालचंद्र



यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस दृष्टिदान दिन म्हणून साजरा केला जातो. मृत्यूनंतर नेत्रदान करावे, याच्या प्रसारासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावत आहेत. आज २१व्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेले आहे, की एका व्यक्तीचे डोळे आणि पर्यायाने त्याची दृष्टी घेऊन ते दुसऱ्याला म्हणजे ज्या व्यक्तीला दृष्टी नाही, अशा व्यक्तीला सहज देता येतात. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. दान देणाऱ्या अशा व्यक्ती एकप्रकारे समाजसेवा करीत असल्याचे श्रेय त्यांना मिळते. अशा सामाजिक स्वरूपाच्या केलेल्या दानामुळे त्या व्यक्तीच्या मनाला शांती, सुख, समाधान व पुण्यही प्राप्त होते. डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी लखलाभ देणगी आहे; परंतु काही व्यक्ती यापासून वंचित असतात. काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. जन्मानंतर त्यांना अंधत्व येते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत. सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही, ते या सृष्टीसौंदर्याला मुकतात. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील. माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. मानवी जीवनात दृष्टीला प्रचंड महत्व आहे, कारण डोळे असले तर कोणतेही काम मनुष्य सहज करु शकतो. त्यामुळे दृष्टी आड सृष्टी किंवा असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी या म्हणी प्रचलित झाल्या आहेत. माणूस जगातील सृष्टिसौंदर्य आपल्या चक्षुंद्वारे अंतःकरणात साठवून ठेवू शकतो. त्यामुळे मानवाच्या पंच इंद्रियांमध्ये डोळ्यांना मानाचे स्थान आहे. डोळ्यांचा उपयोग नयनरम्य, मनोहर सृष्टीसौंदर्य आस्वाद घेण्याबरोबर त्यांची छबी सुंदर चित्राद्वारे इतरांनाही देता येते. दृष्टीहिन मानवाला नयनसुख मिळून जगाच्या सौंदर्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी नेत्रदान, डोळेदान किंवा दृष्टिदान करण्याचा निर्णय प्रत्येक मानवाने केल्यास त्याचा फायदा जगातील नेत्रहीन मानवास निश्चितच होवू शकेल. अर्थात व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान केल्यास मानवी जीवनात त्याचा उपयोग अंध व्यक्तीस निश्चितच होईल. डोळ्यांमुळे माणसांच्या चेहऱ्यावरील हावभाव, स्वभाव प्रत्येक व्यक्ती सहज ओळखू शकतो. त्यामुळेच विविध भाषांमध्ये डोळ्यांच्या विशेषणांची गाणी तयार झाली आहेत. उदा. डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे, डोळे हे जुलमी गडे रोखूनी मज पाहू नको आदी. डोळे माणसाला सौंदर्याबरोबरच अनेक गोष्टी शिकवतात. ते इतर अवयवांपेक्षा अधिकची माहिती माणसाला देतात, जसे की चेहरेपट्टी वरून ओळखला जाणारा व्यक्तीचा स्वभाव, कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याची दृष्टी त्यातून घेतला जाणारा बोध, त्यामुळे दृष्टिदानाचे महत्व चटकन माणसाला जाणवते. दृष्टीहीन या सर्व गोष्टींना मुकतो, त्याच्या जीवनातील अंधार दूर होण्यासाठी किमान प्रत्येक व्यक्तीने मरणोत्तर नेत्र दान करण्याचा संकल्प केला पाहिजे. भारत सरकारने यासाठी विविध योजना हाती घेतल्या आहेत. दृष्टिविकार प्रतिबंधक आणि अंधत्व नियंत्रण कार्यक्रम हा शंभर टक्के केंद्र सरकार पुरस्कृत असून अनेक नेत्रपेढ्या, फिरती नेत्रपथके कार्यरत आहेत. राज्यात सुमारे नऊ लाखांपेक्षा जास्त अंध व्यक्ती असून या नेत्रदान जागृतीमार्फत लाखो व्यक्तींना दृष्टी प्राप्त होऊ शकते. सन १९७९नंतर अंधत्व निवारणासाठी नेत्रशिबीर कार्यक्रम घेण्यात आले आहेत. महाराष्ट्रात जवळजवळ १३ नेत्रचिकित्सक पथके स्थापन करण्यात आली आहेत. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मानण्यात आले आहे; शिवाय नेत्रदान हे मृत्यूनंतर करायचे असल्याने कसलीच भीती नाही. नेत्रदानासाठी व्यक्तीच्या मृत्यूनंतर दोन तासांच्या आत डोळे काढले गेले पाहिजेत. नेत्रदान करणाऱ्या त्याच्या नातलगांकडून पूर्ण प्रक्रिया करून घेण्याची जबाबदारी सोपवावी; म्हणून जिवंतपणी त्या व्यक्तीने संबंधित नातेवाइकांना ही जबाबदारी सोपवून तशी नोंद विहित फॉर्मवर नोंद करावी. टाइम्स आय रिसर्च फाउंडेशनच्या एका पाहणीनुसार ५.५ लाख नेत्रदात्यांपैकी १५ ते ४० वयोगटातील, तर केवळ ४ टक्के व्यक्ती ही ६० वर्षांवरील वयोगटातील आहेत, तर हे प्रमाण वाढणे ही काळाची गरज आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाचे व्हॅलिडेशन डोकेदुखी ठरतेय

आधुनिक केसरी

**शालेय शिक्षण विभागाकडून (ता.१५ )पर्यंत विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अपडेट करण्याच्या सुचना शाळांना देण्यात आल्या आहेत. मात्र, आधारकार्ड अपडेट करताना तांत्रिक अडचणी येत असल्याने शिक्षकांची चांगलीच डोकेदुखी वाढली आहे.संचमान्यता पदस्थापना यामुळे शिक्षक सध्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अपडेट करण्याच्या कामासाठी धावपळ करत आहेत. अनेक शिक्षक आधार केंद्रावर स्वतःच्या वाहनातून विद्यार्थ्यांना नेत आधार दुरुस्ती करत आहे. राज्य सरकारकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी केली जाणारी संचमान्यता ‘आधार नोंदणी’च्या आधारे होणार आहे. सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे आधारकार्ड असणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

यामध्ये अजूनही १९ लाख विद्यार्थ्यांनी ‘आधार’ काढलेले नाही. ज्यांनी काढलेले आहे त्यातील बहुतांश विद्यार्थ्यांच्या कार्डामध्ये नाव, जन्मतारीख, पत्ता, अशा चुका आहेत. या चुका सुधारून ‘आधार’ अपडेट करण्याची जबाबदारी सरकारने शाळांवर टाकली आहे.संचमान्यतेसाठी विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करताना शाळांना जी प्रक्रिया करावी लागते त्यात अनेक अडथळे आहेत, असे शिक्षकांचे सांगणे आहे. सरकारने ‘आधार नॉट जनरेटेड’, ‘आधार नॉट इश्युड’, ‘आधार नॉट सबमिटेड’ आणि ‘आधार मिसमॅच्ड’, अशा चार कलमांखाली माहिती भरायला सांगितली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचे आधार अपडेट न झाल्यास शिक्षकांचे वेतन थाबविले जाणार आहे.आधार अपडेट करण्याच्या वारंवार सूचना शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक देत आहे.शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांना व पालकांना गाठून आधार अपडेट करण्यात व्यस्त आहे.याबाबतीत काही पालकांचे सहकार्य मिळत असेल तरी काही पालक मात्र याबाबतीत दुर्लक्ष करत आहे. त्यामुळें आधार अपडेशन शिक्षकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

माहिती भरल्यानंतरही अनेकदा सरकारी यंत्रणा काम करीत नाही आणि माहिती भरूनही त्याचे ‘स्टेटस’ पूर्वीचेच दाखवत असल्याच्या तक्रारी शाळांकडून केली जात आहे.

विद्यार्थी पटसंख्या विचारात घेताना विद्यार्थ्यांच्या ‘पोर्टल’वर नोंदवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा विचार व्हावा,अशी मागणी शिक्षक करत आहे. शाळेतील घोळ कमी व्हावा, यासाठी २०१३ पासून अस्तित्वात आलेली सरळ प्रणाली मुख्याध्यापकांसह शिक्षकांची डोकेदुखी ठरू लागली असून आधारकार्डच्या मिसमॅचमुळे विद्यार्थ्यांची माहिती अपडेट करताना शिक्षकांची दमछाक होत आहे. आधार कार्ड दुरुस्तीचे काम सेवाकेंद्राऐवजी प्रत्येक केंद्र शाळांना दिल्यास शिक्षकांची दमछाक कमी होऊन आधार लिंकिंगसह सरळ प्रणालीचे काम सरळ होणार असल्याच्या प्रतिक्रिया शिक्षकांमध्ये उमटत आहेत. शालेय शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. अंमलबजावणी करताना शाळास्तरावरून वारंवार माहिती घ्यावी लागते, ही माहिती तयार करून वरिष्ठ कार्यालयास पाठवण्यास शिक्षक, मुख्याध्यापक व प्रशासकीय यंत्रणा याप्रणाली राबवताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रणालीत पुन्हा २०१९ मध्ये आधारकार्ड लिंकची सक्ती करण्यात आली. यानंतर हा घोळ अधिक प्रकर्षणाने जाणवू लागला आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# खा.सुप्रिया सुळेंनी शिष्टमंडळासह घेतली पोलिस आयुक्तांची भेट

## शरद पवार धमकी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांना सोशल मीडियावर 'तुमचा लवकरच दाभोळकर होणार' अशी धमकी आल्याप्रकरणी खासदार सुप्रियाताई सुळे आणि राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने आज मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेत तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. आदरणीय शरद पवारसाहेब यांना 'तुमचा लवकरच दाभोळकर होणार' अशी धमकी सोशल मिडियावर विशेषतः फेसबुकवर देण्यात आली आहे. ही गंभीर बाब लक्षात आल्यावर आज खासदार सुप्रियाताई सुळे यांनी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेऊन तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सोशल मिडियावर आलेल्या त्या धमकीच्या स्क्रीन शॉटची झेरॉक्स पोलीस आयुक्तांना देण्यात आली. यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या समवेत मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, राखी जाधव, प्रदेश सरचिटणीस अदिती नलावडे, राष्ट्रीय प्रवक्ते क्लाईड क्रास्टो आदींसह पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.





# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव व उपसचिव यानी कृषी उत्पन्न बाजार समिती मालमत्ता मिडीया व जनतेसमोर जाहिर करून सर्व व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या माल शासकीय हामी भावाप्रमाणे खरेदी करून जागेवर पैमेट करून शेतकऱ्यांची लुटमार थाबविण्याचे आदेश देण्यात यावे. जनशक्ती शेतकरी सघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे कि कन्नड कुषि उत्पन्न बाजार समिती मध्ये ग्रामिण भागातील शेतकरी आपला शेतमाल आनत आसतात शेती करताना बॅका खाजगी व्यक्ती सावकार यांच्याकडून कर्ज कढुन सपूर्ण कुटुंब शेतात राबुन कपाशी मक्का आदरक सोयाबिन सारखी पीक घेतात शेतमाल काढतात मात्र बाजारात या शेतमालास योग्य सोडा शासकीय हमी भाव सुध्दा मिळत नाही अनेकवेळा तर त्याना शेतातुन बाजारात शेतमाल नेण्याचे भाडे सुध्दा मिळत नाही. व्यापारी शेतकऱ्यांची अडवणुक वअज्ञानाचा फायदा घेत मातीमोल भावाने शेतमाल खरेदी करतात बंधनकारक शासकीय हमी भाव सुध्दा देत नाही सर्व व्यापारी शासकीय हामी भावाने शेतमाल खरेदी करण्याचे सक्तीचे आदेश द्यावेत, व्यापाऱ्यांच्या पेढीवर शेतमालाचे हमी भाव नसल्याने मनमानी पद्दतीने खरेदी करून शेतकऱ्यांचे व्यापार्याकडुन शोषण होते त्या मुळे खरेदी खरीता व्यापार्याच्या पेढीवर हमी भाव सद्याचा भाव याची दररोज व प्रत्येक लिलावा वेळी नोंद घेण्या करीता प्रत्येक व्यापार्यास बंधनकारक करण्यात यावे, व्यापारी शेतकऱ्यांच्या शेतमालाचे लिलाव व भाव याची कोणतीही लेखी नोंद माहिती देत नाही पावतीवर लिलाव बोलीची कोणतीही माहिती नसते याचा गैरफायदा घेत व्यापारी लिलाव पेक्षा कमी दराने माल खरेदी करतात. शेतकऱ्यांचे शोषण न थाबल्यास जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय अतुल भाऊ खुपसे पाटील याच्याआदेशानुसार व छ संभाजीनगर व नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख अनिल शेळके पाटील याच्या प्रमुख उपस्थितीत विजय पाटिल वाघ याच्या अध्यक्षतेखालील सघटनेचे पदाधिकारी शेतकऱ्यांसह कुषि उत्पन्न बाजार समिती कार्यालय कन्नड येथे अनोख्या स्वरूपात अदोलन करतील असे निवेदन माः तहसिलदार कृषि उत्पादन बाजार समितीचे सचिव याना देण्यात आले या वेळी जनशक्ती शेतकरी सघटनेचे छ संभाजीनगर व नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख अनिल शेळके पाटील कन्नड तालुकाप्रमुख अशोक पा पवार कन्नड शहर अध्यक्ष सहिद पवार कामगार आघाडी तालुकाप्रमुख साडु सुरे सोशल मीडिया तालुकाप्रमुख माहेश पा दळवी व ईतर पदाधिकारी शेतकरी उपस्थित होते

# एकाच वेळी १५ हजार वारकरी घेणार माऊलीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज पायीवारी पालखी सोहळ्यासाठी देवस्थानची तयारी पूर्ण झाली आहे. पालखी सोहळ्यातील चांदीचा रथ, दर्शनबारी, सभा मंडपाचे काम पूर्ण झाले आहे. आषाढीवारीसाठी जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा दहा जूनला देहूतून, तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ११ जून रोजी आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. हा सोहळा अनुभवण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक आळंदी, देहूत दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर संस्थानाने जय्यत तयारी केली आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य सेवा आणि पावसापासून संरक्षण मिळावे, या साठी संत तुकाराम महाराज संस्थानने काळजी घेतली आहे. आळंदीत घातपात, चेंगराचेंगरीसारख्या घटना घडू नयेत यासाठी देऊळवाड्यात दर्शनासाठी आलेल्या वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी १०० सीसीटीव्ही कॅमेरे, धातूशोधक यंत्रणा बसविण्यात आली. देवस्थानची सध्या चार हजार क्षमतेची दुमजली दर्शनबारी इमारत असून, भाविकांची संख्या लक्षात घेता, नदीपलीकडे तात्पुरती दर्शनबारी उभारली जाणार असून, १५ हजार भाविक एकाचवेळी दर्शन घेऊ शकतील, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. पालखी सोहळ्यात ३२९ दिंड्यांची नोंद आहे. नव्याने ४५ दिंड्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. टाळ, मृदंग, पखवाज, वीणा व पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यात आली आहे. देऊळवाड्यातील स्वच्छतेसाठी ३० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून सहा सुरक्षारक्षकही तैनात करण्यात आले आहेत. देऊळवाड्यात सुरक्षेसाठी सोळा कॅमेरे बसविण्यात आले आहेत. नगरपरिषद प्रशासनाने देऊळवाडा, पालखी मार्ग परिसरातील अतिक्रमणे हटविली आहेत. त्यामुळे पालखी मार्ग रुंद झाला आहे. नदी परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. एक हजार फिरती स्वच्छतागृह ठेवण्यात आली आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य संचाचे वाटप करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव यांनी सांगितले. वारी काळात २४ तास पाणीपुरवठा केला जाणार आहे. पंधराशे फिरती शौचालये असणार आहेत. मंदिर, इंद्रायणी घाट परिसरासह महत्त्वाच्या ठिकाणी विद्युत दिवे लावले आहेत.

# ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** असामाधानकारक नालेसफाईप्रकरणी दंडात्मक कारवाई झाल्यानंतरही कामात कोणतीही सुधारणा होत नसल्यामुळे ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी मे.जे. एस इन्फ्राटेक या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या ठेकेदाराला पुढील तीन वर्षाकरिता ठाणे महापालिकेत कुठल्याही प्रकारच्या निविदेमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णयही आयुक्त बांगर यांनी घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील नाल्यांची पावसाळ्यापुर्वी नालेसफाई करण्यात येते. पावसाळ्यात नाल्यामध्ये पाणी तुंबून आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पालिकेकडून ही नालेसफाई करण्यात येते. यंदाही महापालिकेकडून अशाचप्रकारची कामे हाती घेण्यात आली आहेत. नालेसफाईची कामे दर्जेदार व्हावीत यासाठी आयुक्त अभिजीत बांगर हे आग्रही आहेत. तरिही शहरात अनेक ठिकाणी ठेकेदारांकडून योग्यप्रकारे नालेसफाई होत नसल्याच्या तक्रारी नागरिक, लोकप्रतिनिधी करीत आहेत. उथळसर प्रभाग समिती क्षेत्रातील नालेसफाईची कामे चांगल्या दर्जाची होत नसल्याची बाब महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली होती. येथे नालेसफाई व्यवस्थित पद्धतीने होत नसल्याबाबत नागरिकांनीही तक्रारी केल्या होत्या. याबाबत मे.जे. एस इन्फ्राटेक या ठेकेदाराला नोटीस काढून १ लाख १५ हजारांचा दंड आकारण्यात आला होता. या कारवाईनंतरही वारंवार नोटीसा देऊनही ठेकेदाराच्या कामात कोणतीही सुधारणा झाली नाही. आयुक्त बांगर यांनी केलेल्या पाहाणी दौऱ्यातही त्यांना हे चित्र दिसून आले आहे. असमाधानकारक नालेसफाईप्रकरणी काळ्या यादीत का टाकण्यात येवू नये याचा खुलासा संबंधित ठेकेदाराकडून मागविण्याचे निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले होते. परंतु ठेकेदाराने कोणताही समाधानकारक खुलासा सादर केला नाही. त्यामुळे कामामध्ये सुधारणा करण्यात पूर्णतः अपयशी ठरल्याप्रकरणी मे. जे. एस इन्फ्राटेक या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय आयुक्त बांगर यांनी घेतला आहे. तसेच त्याला पुढील तीन वर्षाकरिता ठाणे महापालिकेत कुठल्याही प्रकारच्या निविदेमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णयही त्यांनी घेतल आहे.




नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ, संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# जागतिक नेत्रदान दिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी


**आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला.**

घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात.



जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

# चहा घ्यावा, चहा द्यावा ...!



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**गेल्या रविवारी जागतिक चहा दिन होता. त्या दिवशी काही कारणाने हा लेख टाकू शकलो नाही पण आज तो आपल्याला वाचायला नक्की आवडेल . ही डॉक्टर मंडळी ना, कमालीची अरसिक बुवा...! नाहीतर काय ? काहीही सांगतात...! म्हणे दुपारी झोपू नका. आता दुपारची एखादी डुलकी घेतल्यावर किती फ्रेश वाटते ते यांना कोण सांगणार...! नंतर म्हणे चहा घेऊ नका, भजी इ. सारखे तळलेले पदार्थ खाऊ नका. सगळा नन्नाचा पाढा. आपण म्हणतो ना नकारात्मक बोलू नये. पण ते यांना ते कोण सांगणार...? आणि ते जे होकारात्मक सांगतात ते मानवत नाही. उदा. लवकर उठा, व्यायाम किंवा योगा करा. उकळलेले पाणी प्या. वगैरे. आणि हो डॉक्टरांकडे जाताना अशा वेळी सौ बरोबर नसली म्हणजे मिळवली. "**

नाहीतर बघा, मी म्हणत होते ना...पण माझं मेलीचं कोण ऐकत... ? असे काही ऐकून घेण्याची तयारी ठेवावी." या डॉक्टरांच्याही पार्ट्या होतात म्हणे...! ओल्या वगैरे मी म्हणत नाही. त्यावेळी सगळे चालते मग पेशंटलाच गंभीर चेहऱ्याने असे सल्ले का देतात कुणास ठावूक ? ( हा सर्व मजकूर डॉक्टर मंडळींची माफी मागून लिहिला आहे. काय आहे बरेच डॉक्टर माझे मित्र आहेत. त्यांच्याकडे केव्हाही जावे लागेल तेव्हा माझी खैर नाही. )

मंडळी हे सगळे लिहायला कारण असे झाले की, काल मी दुपारी थोडा वेळ झोपलो होतो. म्हणजे रोजच थोडा वेळ डुलकी चांगल्या शब्दात सांगायचे तर वामकुक्षी घेतो. काल जाग आल्यावर उठून पहिले तर मस्त पाऊस पडत होता. अशा वेळी माझा आवडता छंद म्हणजे बाहेर येऊन बसणे. आणि पाऊस न्याहाळणे. पावसाचा आनंद घेणे. हा आनंद घेत असताना हातात वाफाळत्या चहाचा कप असेल तर काय मजा येते महाराजा ..! ( अशा वेळी गरम कांदा भजी असतील तर काय विचारता..! वि वा शिरवाडकरांना कांदा भजी खूप आवडत असत असे ऐकले आहे. या बाबतीत त्यांच्या आणि माझ्या आवडी जुळतात. पण कांदा भजी हा वेगळा विषय आहे.आज चहाबद्दलच बोलू या. ) तर काल असाच बऱ्याच दिवसांनी पाहुण्यासारखा आलेल्या पावसाला निरखीत बसलो. मग काय चहाची तलफ आली. पण



पाहतो तो काय आमच्या सौ कुठेतरी बाहेर गेलेल्या. कधी कधी मी स्वतः ही चहा बनवतो, पण हिच्या चहासारखा चहा काही मला जमत नाही. ( आणि हे कबुल करण्यात मला कमीपणा वाटत नाही. माणसाने प्रामाणिक असावे. आणि काही काही गोष्टी कबूल करून टाकाव्यात )

तर असा हा चहा. प्रत्येक वेळी त्याची लज्जत न्यारी. सकाळी वर्तमानपत्र वाचताना हातात चहाचा कप असला की बातम्याही चवदार होतात जणू काही...! मग मोदी काय म्हणाले, उद्धव काय म्हणाले, पवारांनी कोणती विधाने केली हे सगळे चहाच्या घोटाबरोबर वाचताना फार मजा येते. मी असं ऐकलय की रेल्वे स्टेशनवर पूर्वी चहा दोनच वेळा मिळायचा. सकाळी आणि संध्याकाळी चार वाजता. पण कोणातरी हुशार, सुज्ञ व्यक्तीने दिवसातले चोवीस तास चहा विकण्याची कल्पना शोधून काढली. पण त्याची कल्पना लोकांनी खरी ठरवली आणि लोक कोणत्याही वेळी चहा पिऊ लागले. मध्यरात्री अगदी बारा वाजता गाडी एखाद्या स्थानकावर थांबली असेल तर तेव्हाही काही महाभाग.( ..! ) चहा पिताना आपल्याला हमखास दिसतील. तात्पर्य, चहाला कोणतीही वेळ वर्ज्य नाही.

प्रसंग आनंदाचा असो वा दुःखाचा. चहा हा स्वागतार्ह असतो. अगदी मित्रांमधली पैज असो, नाहीतर रंगलेला गप्पांचा फड असो त्याचा शेवट चहानेच व्हायचा. चहाच्या जन्माचीही कथा मजेदार आहे. अगदी चहाच्या चवीसारखी. अशी आख्यायिका आहे की एकदा चीनचा एक सम्राट लढाईसाठी जंगलातून फिरत होता. त्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने सावधानी बाळगावी म्हणून तो पाणी सुद्धा उकळून पीत असे. एकदा तो असेच थकून बसलेला असताना त्याने पिण्यासाठी गरम पाणी मागवले. तेव्हा नकळत पाण्यात झाडाची चारदोन पाने पडली. त्या पानांमुळे पाण्याचा रंग बदलला आणि त्याने कुतूहल म्हणून ते पाणी पिऊन पाहिले तर काय अप्रतिम चव, सुगंध आणि स्वाद यामुळे तो खुश झाला आणि त्याची झोप, त्याचा थकवा कुठल्या कुठे पळून गेला. आहे की नाही मजेशीर कथा ..!

तर असा हा मजेशीर चहा. या चहाचा शोध सतराव्या शतकात इंग्रजांना लागला असे म्हणतात. मग त्यांनी तो त्यांच्यासोबत भारतात आणला. ब्रिटीशांनी ज्या काही बऱ्यावाईट गोष्टींची देणगी भारताला दिली त्यात चहा या पेयाचा समावेश होतो. पण त्यांचा तो काळा, कमी उकळलेला, कमी दुध साखर घातलेला चहा आपण बदलून टाकला. त्याला भारतीय रूप दिले. जास्त उकळलेला, जास्त दुध साखर असलेला चहा आपण घ्यायला लागलो. चहाचे अनेक प्रकार आहेत. black tea, ग्रीन टी इ. पण लोकप्रियता आपल्या नेहमीच्याच चहाला लाभली बर का...! पूर्वी ( आणि अजूनही काही वेळा ) वधू परीक्षा करताना ती मुलगी चहा, पोहे कसे देते, त्यावेळी ती कशी दिसते,चालते बोलते कशी याचे निरीक्षण केले जायचे. एकंदरीत काय चहा हा वधुपरीक्षेचा एक अविभाज्य भाग होता. सौतन या चित्रपटात एक गाणे आहे. ' शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है, इसीलिये मम्मीने तुम्हे चाय पे बुलाया है.' उषा खन्ना यांचे संगीत असलेले हे बहारदार गाणे गायिले आहे किशोरकुमार आणि लता मंगेशकर यांनी. तेव्हा मंडळी, हे गाणे ऐका. आणि चहाचा आस्वाद घ्या. वाटलं तर मलाही ' चायपे ' बोलवा. ( माझ्या 'कवडसे सोनेरी.. अंतरीचे' या पुस्तकातून साभार )

# सृष्टीचा आविष्कार पाहण्यासाठी मिळालेले वरदान



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सत्य असत्य जाणुन घेऊन सत्याची अभिव्यक्ती होण्यासाठी मिळालेले दिव्य चक्षु आज मात्र कुठेतरी कमी पडता आहेत. आपली दिव्यता आणि पवित्रता राखण्यात चक्षू कमी पडत असल्याने जगात असत्याचा बोलबाला वाढीस लागला आहे. आपण कोणाचे पाठिराखे झाले पाहिजे यामध्ये आपले नेत्र खुप महत्वपूर्ण भूमिका निश्चित करतात आणि त्यानुसार आपण ती बाजु घेतो. सृष्टी ही प्रचंड भव्य दिव्य आहे या सृष्टीचा निर्माता भगवंत या पेक्षाही दिव्य आहे. ही कल्पना एवढी सुंदर आहे तर वास्तव कसं असेल आणि हेच वास्तव पाहण्याची आपल्यामध्ये निर्माण होऊन आपल्याला या दिव्यतेची अनुभुती प्रत्यक्ष घेता आली पाहिजे. यासाठी आपल्याला मिळालेले नेत्र हे फक्त नेत्र नाहीत तर ते दिव्य चक्षू दिव्य दृष्टीचा आविष्कार होण्यासाठी मिळालेलं वरदान आहे . हिच बाब आपण विसरतो.**

ही बाब हितकारक नसुन आपल्या हितासाठी आपण हेच वरदान सार्थकी ठरवलं पाहिजे. पण आपण नको ते पाहतो आणि ज्या साठी नेत्र मिळाले ते पाहण्याचा कधी प्रयत्न पण करत नाही. वास्तविक व्यक्ती तितक्या प्रकृती आहेत प्रत्येकाचं मत भूमिका हि वेगळी असु शकते. शेवटी आपल्याला मिळालेले नेत्र कशासाठी कारणी लावायचे हा प्रत्येकाचा व्यक्तिगत पातळीवर अधिकार आहे. पण याचा आपण कधीतरी विचार केला पाहिजे. निसर्गाच्या निर्मात्यांने आपल्याला सृष्टीच वास्तविक सौंदर्य पाहता याव त्याच बरोबर वास्तवाचा बोध व्हावं. सत्य न्याय धर्म आचरण करता यावं आणि जीवन विषय दिव्य आणि गुह्य ज्ञान दिव्य चक्षूच्या माध्यमातून ग्रहण करता यावं यासाठी प्रामुख्याने नेत्र प्रदान केले. हीच दिव्यता पवित्रता आपण टिकवली पाहिजे. ही पवित्रता टिकवणे हिच आयुष्यातील सर्व श्रेष्ठ उपलब्धी आहे. नेत्र असणं म्हणजे दिव्य दृष्टी असणं असं होत नाही. ज्या दिवशी दिव्य दृष्टी प्रकट होईल त्या दिवशी आपल्या जन्माच सार्थक होईल. ज्ञान वास्तव भौतिक जगत शाश्वत जगत हे सगळं आपल्याला आपल्या दिव्य चक्षुनी पाहता आलं पाहिजे. सत्य असत्य यामधील भेद जाणुन निश्चित करता आला पाहिजे त्याच बरोबर आपण सत्याच्या न्यायच्या बाजूने भक्कम उभा राहिल पाहिजे नाही तर मग आपण डोळे असून आंधळे आहेत अशीच काहीशी आपली अवस्था होईल या मध्ये शंका नाही. मग आपल्याला काही वेगळे परिमाण या मधुन अपेक्षित नाहीत असंच काहीसं वाटणं स्वाभाविक असत. मानवता जोपासण्यासाठी वृद्धीसाठी आणि उत्तरोत्तर यशस्वी पणे पुढे घेऊन जाण्यासाठी आपले नेत्र हे काल नेत्र ठरले पाहिजेत. सृष्टीची अनुपम सुंदर संरचना मानवासह अनेक जीवांचे कल्याण होण्यासाठी आहे. या कल्याणात नेत्र हे पथदर्शकाची भूमिका अदा करत असतात. नेत्र मानवी जीवनाची दिशा आणि दशा बदलतात. आपण जे काही पाहतो आहेत त्या



वेळी आपल्या दृष्टीची दिव्यता पवित्रता प्रकट झाली नाही तर आयुष्यच प्रचंड मोठं नुकसान होऊन जातं . मुळात दिव्यता भव्यता सोडुन आपल्याला निकृष्ट बाबी पाहण्याची सवय जडते . सद्गुण हितकारक बाबी लवकर अंगवळणी पडत नाहीत. वाईट अवगुण अहितकारक बाबी शिकावाव्या लागत नाहीत. त्या सहज अंगवळणी पडतात.आणि मग आपण तसेच घडतो .आपलं आयुष्य आणि भविष्या उज्वल करण्यासाठी आपण काळजी पूर्वक दिवसेंदिवस आपल्या चक्षु ची दिव्यता पवित्रता वाढवली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आपल्या दिव्य चक्षु ची पवित्रता निकृष्ट होणार नाही अथवा त्या दिशेने जाणारं नाही याची खात्री काळजी आपण नियमित सदैव क्षणोक्षणी घेतली पाहिजे.आणि हि काळाजी आपण घेतली नाही तर होणा-या नुकसानीस आपण स्वतः व्यक्तिशः जबाबदार असतो. आपण आपल्या चक्षु ची दिव्यता पवित्रता जपली पाहिजे सांभाळली टिकवली पाहिजे हेच अध्यात्मिक ज्ञान युगोयुगो उपदेश करत आहे .जीवन मार्ग यशस्वीपणे आणि निर्विघ्न पणे पुर्ण करण्यासाठी चक्षु ची दिव्यता कारणीभुत ठरते. अपवित्र चक्षु क्षणोक्षणी अनेक अडचणी संकट निर्माण करतात .कित्येक वेळा तर खुप मोठ्या संकटांना सामोरं जावं लागतं .मुळात मनाची अवस्था स्थिर सात्विक ठेवण्यासाठी नेत्र सिंहांचा वाटा उचलत असतात. आपल्याला काय दिसलं या पेक्षाही आपण काय पाहिलं हे आपल्या दिव्य चक्षु च्या पवित्रतेवर अवलंबुन असतं .हिच पवित्रता आपण मनांत साठवली पाहिजे. जेणेकरून हे विश्व माझं घर आहे.जगातील प्रत्येकाशी माझं कौटुंबिक नांत आहे.आपल ज्ञान संस्कार जोपासण्यासाठी म्हणून जगाकडे पाहण्याची उदारता आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे आणि हिच उदराता भव्यता दिव्यता तडीस जाण्यासाठी आपल्या दिव्य चक्षु ची पवित्रता आपण टिकवली सांभाळली पाहिजे.जेणेकरुन निसर्गाचा आपल्याला दिव्य चक्षु प्रदान करण्याचा मुख्य उद्देश हेतु साध्य होईल.



# गरजूंना पिठाची गिरणी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** आर्य वैश्य समाजातील गरजवंत परी त्यक्त्या विधवा महिलांना उपजीविका भागविण्यासाठी पिठाची गिरणी वाटप कार्यक्रम आणि महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेची परभणी जिल्हा कार्यकारिणीची बैठक आणि जिंतूर तालुका महासभा नूतन कार्यकारिणी शपथग्रहण सोहळ्याचे आयोजन रविवारी ता ४ जिंतूर येथील नगरेश्वर मंदिराच्या सभागृहात करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता जिल्हा कार्यकारिणीची महत्वाची बैठक होणार असून सकाळी ११ वाजता महासभेच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा होणार आहे . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार पुणे हे तर महेश महाराज जिंतूरकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे . प्रमुख पाहुणे म्हणून महासचिव गोविंद बिडवई , कोषाध्यक्ष सुभाष कन्नावार , राज्य बांधकाम समिती अध्यक्ष भानुदास वट्टमवार पुणे, राज्य उपाध्यक्ष सुधीर पाटील परभणी, बांधकाम समिती कोषाध्यक्ष अनिल मनाठकर नांदेड, उपाध्यक्ष किरण वट्टमवार, राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, राज्य प्रसिद्धी प्रमुख पत्रकार नरेंद्र येरावार हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातच जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती , संचालक व इतर मान्यवरांचा सत्कार सोहळा संपन्न होणार असून परभणी जिल्ह्यातील समाजाच्या गरजवंत महिलांना स्वावलंबी होण्यासाठी सह्याय म्हणून पिठाची गिरणी वाटप कार्यक्रम आयोजित केला आहे. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महासभेचे जिल्हाध्यक्ष बालाजी डुब्बेवार , जिंतूर आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष सखाराम चिद्रवार व किरण वट्टमवार जिंतूर महासभेच्या वतीने करण्यात आले आहे.

# अतिविषारी क्रेट सापाचा दंश; डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अतिविषारी क्रेट सापाने दंश केलेल्या अत्यवस्थ पत्नीला घेऊन तिचा पती मेडिकल रुग्णालयात आला. पत्नीवर उपचारही सुरू झाले. काही तासांतच पतीचीही प्रकृती खालावू लागली. त्यालाही सर्पदंश झाल्याचे कळलेच नव्हते. अखेर तो जीवनरक्षण प्रणालीवर गेला. परंतु त्याच्यावरही डॉक्टरांनी उपचार सुरू केले. शेवटी डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश आल्याने दाम्पत्य बचावले. पुरण ( ४५ ) पती आणि रुखमिणीबाई ( ४० ) पत्नी अशी दोघांची नावे आहेत. दोघेही विटभट्टी कामगार असून कामठी रोडवरील खसाळा नाक्याजवळच्या विटभट्टीवर ते कामावर आहेत. येथेच एका झोपडीत राहतात. ४ जूनला नेहमीप्रमाणे काम झाल्यावर ते झोपडीत परतले. पहाटे २.३० वाजताच्या दरम्यान पत्नी किंचाळल्याने पती दचकून उठला. त्यांच्या खोलीत साप होता. पत्नीला साप चावल्याने तिची प्रकृती खालवू लागली. पतीने तातडीने मेडिकलचा आकस्मिक विभाग गाठला. डॉक्टरांकडून उपचाराला सुरुवात झाली. पतीने साप बघितला असल्याने तो क्रेट जातीचा अतिविषारी असल्याचे स्पष्ट झाले. दोघेही शेजारी झोपले



असल्याने डॉक्टरांनी पतीलाही साप चावला का, अशी विचारणा केली. परंतु त्याने नाही म्हटले. पहाटे ५ वाजताच्या सुमारास पतीलाही छातीत दुखायला लागले. डॉक्टरांनी ईसीजी काढून घेतला. त्याचा अहवाल निगेटिव्ह आला. प्रकृती जास्तच खालावल्यावर त्याला जीवनरक्षण प्रणालीवर ( व्हेंटिलेटर ) ठेवले व अंदाजानुसार सर्पदंशानंतरचे उपचार सुरू केले. शेवटी उपचाराला यश मिळाले. सुमारे ३२ तासांनी पती-पत्नी दोघेही बरे झाले. मेडिकलच्या औषधशास्त्र विभागाचे डॉ. मिलिंद व्यवहारे, डॉ. प्रवीण शिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. आशीष, डॉ. रामकिशन, डॉ. अस्मिता, डॉ. श्रुतिका, डॉ. भाग्यश्री, डॉ. रुषिकेश, डॉ. पंकज आणि डॉ. हरीश यांनी परिश्रम घेतले.

# साखर, मीठ, तेलाचे डबे खरेदी करून कोटींची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मार्केट यार्डातील भुसार बाजारातील एका व्यापाऱ्याकडून खरेदी केलेल्या भुसार मालाचे पैसे न देता चार कोटी ७२ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका व्यापाऱ्याविरुद्ध मार्केट यार्ड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी शमीत शशिकांत बंब ( वय ३५, रा. मार्केट यार्ड ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका व्यापाऱ्याने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार व्यापाऱ्याची भुसार बाजारात पेढी आहे.

बंब याने व्यापाऱ्याकडून साखर, मीठ, तेल डबे असा माल खरेदी केला होता. बंब याने भुसार व्यापाऱ्याला रोख, ऑनलाइन स्वरुपात रक्कम दिली होती. उर्वरित चार कोटी ४२ लाख पाच हजार ५७८ रुपये दिले नव्हते. भुसार व्यापाऱ्याकडून खरेदी केलेल्या मालाची विक्री अन्य व्यापाऱ्यांना करुन बंब याने रक्कम परत केली नाही. भुसार व्यापाऱ्याने रक्कम परत करण्याबाबत बंबकडे विचारणा केली. तेव्हा त्याने उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर व्यापाऱ्याने पोलिसांकडे तक्रार दिली. फसवणूक, अपहार केल्याप्रकरणी बंबविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे तपास करत आहेत.



# महिला बचत गटांना २ कोटी ७१ लाखाचे बँक कर्ज वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत तालुका जळगाव जा व संग्रामपूर पंचायत समिती च्या संयुक्त विद्यमाने दि.8 जुन रोजी जळगाव जामोद येथे महिला स्वयं सहाय्यता समूहांना बँक कर्ज वाटप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बुलडाणा लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार मा.प्रतापरावजी जाधव साहेब हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. राजेश इंगळे साहेब प्रकल्प संचालक जि.ग्रा.विकास यंत्रणा बुलडाणा उपस्थित होते ,.मेळाव्याला संबोधित करताना मा प्रतापराव जाधव साहेब म्हणाले कि, महिला स्वयं सहाय्यता समूहातील भगिनींनी केवळ शासनाच्या मदत ,बँक कर्जावर अवलंबून न राहता मिळालेल्या पैशातून स्वतःच्या उपजीविका निर्माण कराव्यात. आपले उत्पादन उत्कृष्ट पॅकेजिंग व ब्रॅण्डिंग यावर भर द्यावा. त्याला बाजार पेठेत निश्चितच मोठी मागणी मिळेल. त्याच अनुषंगाने स्वयं सहाय्यता समूहातील महिलांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी तालुकास्तरावर विक्री केंद्र तसेच जिल्हास्तरावर मॉल ची निर्मिती करण्यात येत आहे.समूहातील महिलांनी उत्पादने तयार करून त्याच्या विक्रीसाठी महिलांचीच वेगळी टीम काम करेल.जिल्हा मॉल वरील अतिरिक्त उत्पादने अमेझॉन,व फ्लिपकार्ट अशा ऑनलाईन प्लॅटफॉर्म वर सुद्धा उपलब्ध करून त्या उत्पादनाच्या विक्रीची व्यवस्था करण्यात येईल. या पद्धतीने महिलांची एक टीम तयार करून आपल्या महिलांच्या उत्पादनाचा ब्रँड तयार करून जागतिक पातळीवर बुलडाणा जिल्हयातील उत्पादनांना विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला आहे. सदर बँक मेळाव्यात 117 समूहांना 2 कोटी 71लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राजेश इंगळे साहेब मा.प्रकल्प संचालक म्हणले कि महिलांचे उत्पन्न 1 लाख रुपायापर्यंत वाढवणे व त्यांचे राहणीमान उंचावणे हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश या वेळी मा.संजय पाटील साहेब गटविकास अधिकारी प.स. जळगाव जा व संग्रामपूर, शांताराम दाणे शिवसेना जिल्हा प्रमुख , अजय पारस्कार तालुका शिवसेना प्रमुख, नितीन मेश्राम जिल्हा अभियान व्यवस्थापक ,विक्रांत जाधव जिल्हा व्यवस्थापक यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन विनोद शेगोकार तालुका अभियान व्यवस्थापक जळगाव जामोद यांनी केले तर आभार प्रदर्शन भगवान इंगळे तालुका अभियान व्यवस्थापक संग्रामपूर यांनी केले. सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी जळगाव जामोद व संग्रामपूर ब्लॉक मधील कृष्णा देशमुख, पराग कराळे,परशुराम,लोखंडे,उमेश अरबट,अमोल वैराळे, सुबोध खोब्रागडे,अनिल कफनकर प्रभाग समन्वयक,एकता सरकटे मॅडम डेटा एन्ट्री ऑपरेटर सोबतच तालुका जळगाव जा व संग्रामपूर तालुक्यातील सर्व कॅडर महिला, मोठ्या संख्येने उपस्थितीत होत्या.

# पन्नास लाखांची रुग्णवाहिका धूळखात

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** राज्यात बालमृत्यूसाठी सर्वात अग्रेसर तालुके म्हणून धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यांची ओळख आहे. या भागातील बालमृत्यू कमी करण्यासाठी पन्नास लाख रुपये खर्च करुन अत्याधुनिक अशी नवजात शिशु रुग्णवाहिका खरेदी करण्यात आली होती. मात्र ही रुग्णवाहिका गेल्या 10 महिन्यांपासून धूळखात पडून असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे परिसरातील विविध शासकीय रुग्णालयांच्या सहापैकी पाच ॲम्बुलन्स बंद अवस्थेत असल्याने या भागातील अत्यावश्यक सेवा सलाईनवर असल्याचे समोर आले आहे.

राज्य शासनाने ऑगस्ट 2022 मध्ये धडगाव ग्रामीण रुग्णालयाला पन्नास लाख रुपयांची अत्याधुनिक अशी नवजात शिशु रुग्णवाहिका देखील दिली होती.

# इसम बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** आनिल रंगनाथ मांडवगड वय ३७ वर्षे,



धंदा शेती, रा. जटवाडा ता. जि. छत्रपती संभाजी नगर हे कोणालाही न सांगता दि. ०४ जून रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जटवाडा येथून निघून गेले. अनिल याने त्यांच्या पत्नीच्या आत्याच्या मुलाला हातउसणे पैसे दिले होते ते पैसे वेळेवर परत न दिल्यामुळे त्यांच्यात वाद झाल्याने नाराज होवुन घरातुन कोणालाही कामी न सांगता घरातुन निघुन गेले त्यांचा पत्नी व नातेवाईक यांनी जटवाडा गावात, नातेवाईकाकडे व इतर ठिकाणी भरपुर शोध घेतला परंतु मिळुन आले नाही.

वर्णन रंग सावळा, बांधा- मजबुत, उंची ६ फुट, चेहरा लांबट गोल, केस काळे बारिक, नाक-सरळ, अंगात राखाडी - रंगाचे फुल शर्ट व राखाडी रंगाची फुल पेंट, पायात पॅरागॉन सिलिपर चप्पल, भाषा- मराठी, हिंदी बोलतो.

अनिल यांची पत्नी लताबाई हिच्या फिर्यादीवरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार व्ही एस खंडागळे हे करत आहे.



# लाभार्थींनी ई केवायसी प्रमाणीकरण करावे : कृषी अधिकारी आर. जी. गुंडीले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पीएम किसान सन्मान योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांना आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी यांनी केले आहे. योजनेअंतर्गत चौदाव्या हप्त्याच्या वितरण नियोजनासाठी राज्यात गाव पातळीवर व सर्वत्र मोहीम राबवून ई-केवायसी व बँक खाते आधार संलग्न करण्याचे निर्देश आहेत. ई-केवायसी प्रमाणीकरण अभावी कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये यासाठी सर्व प्रलंबित शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सोयगाव कृषी सहाय्यकांचे मदतीने प्रलंबित ई-केवायसी प्रमाणीकरण व आधार संलग्न काम करून घ्यावे, असे आवाहन आर जी गुंडीले तालुका कृषी अधिकारी सोयगाव यांनी केले आहे. केंद्र शासनाने पीएम किसान पोर्टलवर फार्मर कॉर्नरमध्ये ओटीपी आधारे तसेच सामाईक सुविधा केंद्राद्वारे लाभार्थ्यांची ई-केवायसी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाने विकसित केलेल्या पीएम किसान ऍप अँड्रॉइड मोबाईलवर फेस ऑथेंटीकेशनद्वारे पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांनाही केवायसी प्रमाणीकरण करण्यासाठी नवीन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. या सुविधेच्या माध्यमातून सर्व लाभार्थ्यांना स्वतःचे ई-केवायसी प्रमाणीकरण तसेच इतर ५० लाभार्थ्यांचे सुद्धा ई-केवायसी प्रमाणीकरण करता येणार आहे. शेतकऱ्यांनी क्षेत्रीय अधिकारी, सोयगाव विभागाचे कृषी सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक यांच्या मार्फत गाव पातळीवरील सर्व प्रलंबित ई-केवायसी प्रमाणीकरण व आधार संलग्न करून घ्यावे. कमी वेळ शिल्लक असल्याने शनिवारी व रविवारी यादिवशी काम सुरू ठेवण्यात येणार आहे. ऍपच्या माध्यमातून तत्काळ प्रलंबित ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे तालुका कृषी अधिकारी आर.जि.गुडिले सोयगाव कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.तरी ज्या पात्र लाभार्थी यांचे नावे आधार प्रामाणिकरण त्रुटी मध्ये आले आहे नजीकच्या पोस्ट आफिस जाऊन शेतकऱ्यांनी खाते उघडून घ्यावे अशे आवाहन सोयगाव कृषी विभागाने केले आहे.

## वादग्रस्त स्मारक जमीनदोस्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील ऐंशी फुटी रोड आणि वडजाई रोडलगत उभारण्यात आलेले वादग्रस्त ठरलेले स्मारक अखेर रात्रीतून हटविण्यात आले. हे स्मारक विनापरवानगी उभारण्याचा प्रयत्न झाल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्याने जिल्हा प्रशासनाने ही कारवाई केली.

दिवसांपूर्वी उभारण्यात आलेल्या या स्मारकाला टिपू सुलतान असे नाव देण्यात आले होते. भाजप नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी या स्मारकावर आक्षेप घेतला होता. भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड.रोहित चांदोडे, स्थायी समितीचे माजी सभापती सुनील बैसाणे यांनी स्मारक हटवा, धुळे शहराची शांतता वाचवा, अशी मागणी केली होती. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्यासह अन्य संघटनांकडूनही तशी मागणी होऊ लागल्याने महापौर प्रतिभा चौधरी यांनी बेकायदेशीरपणे उभारण्यात स्मारक तत्काळ हटविण्याची सूचना प्रशासनाला केली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची बैठक घेतली. स्मारकाचे काम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारीही बैठकीस उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे स्मारक हटविण्याचा निर्णय घेऊन तसा आदेश काढला. स्मारक उभारण्यासाठी कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले. हे स्मारक बेकायदेशीर असल्याचे बांधकाम करणाऱ्याने मान्य केल्यावर अखेर स्वतः बांधकाम करणाऱ्यालाच हे स्मारक जमीनदोस्त करावे लागले.

## रिक्षाचालकाचा प्रवाशावर धारदार कोयत्याने हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अलिबागला जाण्यासाठी रिक्षाने एक प्रवासी पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानक येथे रिक्षात आला. मात्र, रिक्षाचे भाडयाचे कारणावरुन त्याचे वाद रिक्षाचालका सोबत झाल्यानंर रिक्षाचालकाने त्याच्यावर साथीदारांचे मदतीने कोयत्याचा वार करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्याच्या कानाचा लचका तोडून त्यास जखमी करुन पसार झाला होता. याप्रकरणी फरार रिक्षाचालकास जेरबंद करण्यात स्वारगेट पोलिसांना यश आले आहे. आदेश संजय काळे (वय-३९,रा.पर्वती दर्शन,पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सदर आरोपी हा रेकॉर्डेवरील गुन्हेगार असून त्याचेवर यापूर्वी खुनाचे तीन गुन्हे व इतर चार गंभीर गुन्हे दाखल आहे. याबाबत स्वारगेट पोलिस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल आहे. तक्रारदार हे 1 जून रोजी एक वाजण्याचे सुमारास मुळगावी अलिबागला जाण्यासाठी स्वारगेट एसटी स्थानकात रिक्षाने आले होते. त्यावेळी आरोपी रिक्षा चालका सोबत त्यांचे रिक्षाचे भाडयाचे कारणावरुन वाद झाल्यावर, संबंधित रिक्षाचालक व त्याचे दोन इतर रिक्षाचालकांनी तक्रारदार प्रवाशास मारहाण करुन रिक्षाचालकाने त्याचेवर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रवाशाने सदर वार हुकवल्याने तो खोली पडला. त्यावेळी रिक्षाचालकाने त्याचे कानाचा चावा घेवून कानाचा लचका तोडून त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. संबंधित गुन्हयातील आरोपी हा सराईत असून तो बारामती येथे असल्याची माहिती तपास पथकाचे पोलिस अंमलदार अनिस शेख व शिवा गायकवाड यांना मिळाली होती. पोलिसांनी खातरजमा केली असता, आरोपी स्वारगेट एसटी स्थानक परिसरात आल्याची माहिती मिळाली.



## हरिनाम सप्ताहाला मठाधिपती रामगिरी महाराजांची संमती

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** योगीराज गंगागिरी महाराज मूळचे वैजापूर तालुक्याचे आहेत. कागदोपत्री जरी सराला बेट श्रीरामपूर तालुक्यात असले तरी मूळचे ते वैजापूर तालुक्याचेच आहे, या साठी येणारा १७६वा योगीराज गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह वैजापूरलाच होईल, मात्र प्रत्यक्ष सप्ताहाचा नारळ पुणतांबा येथील आषाढी एकादशीला प्रदान करण्याची पद्धत आहे. त्यामुळे त्या दिवशी योग्य निर्णय होईल, असे सूचक अमृत वचन मठाधिपती हभप रामगिरी महाराज यांनी गुरुवारी सप्ताह ठिकाणची स्थळ पाहणी केल्यानंतर जमलेल्या हजारो भक्त भाविकांसमोर बोलताना सुभद्रा लान येथे केले. महाराज पुढे म्हणाले की, हा योगीराज सदगुरू हरिनाम सप्ताह हा सर्व जाती धर्म, पंथ व संप्रदायाच्या बंधू-भगिनींचा आहे, वैजापूर शहर व तालुक्यातील सर्व स्तरातील नागरिकांनी सप्ताहाला यावे. याप्रसंगी आ.रमेश पा.बोरनारे, डॉ.दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान यांनी सप्ताह मिळावा म्हणून आग्रह केला. प्रास्ताविक व सूत्र संचलन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा, साळुंके व शहर प्रमुख पारस घाटे यांनी मानले. या प्रसंगी विशाल शेठ संचेती, मार्केट समिती सभापती रामहरी जाधव, उपजिल्हा प्रमुख बाबासाहेब जगताप, कल्याण जगताप, भागीनाथ दादा मगर, अंकुश हिंगे, खुशालसिंह राजपूत, महिला आघाडी च्या पदमा साळुंके, सुलभा भोपळे, ज्ञानेश्वर टेके, प्रेम राजपूत, गोटू राजपूत, सीताराम पाटील वैद्य, अमोल बोर नारे, प्रकाश शेठ बोथरा, काशिनाथ शेठ गायकवाड, महेंद्र काटकर, सावनसिंह राजपूत, राम उचित, गौतम गायकवाड, हभप भरत महाराज, ह.भ.प.गणेश महाराज, हभप मधू चंद्रकांत महाराज यांच्यासह गंगापूर, पैठण व वैजापूर ग्रामीण भागातील भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फळपिक विमा योजनेचे ऑनलाईन अर्ज भरणे सुरु : तालुका कृषी अधिकारी गुंडिले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात मोहिमेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फळपिक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचे आवाहन सोयगाव तालुका कृषी अधिकारी आर. जी. गुंडिले यांनी केले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत आणि महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे प्रायोजित एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी करीत आहे..ह्या योजनेत सहभागी होण्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रे ७/१२ एकूण जमिनीचा दाखला, स्वयं घोषणापत्र, जीओ टॅग केलेल्या फळबागेचे फोटो, आधार कार्ड, बॅंकेच्या पासबुकची झेरॉक्स व सदर योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित पिकासाठी ऐच्छिक करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पिक विमा व फळपिक विमा योजनेत कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास सहभागी न होणे बाबत घोषणापत्र योजनेतील सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर मंजूर केलेल्या बॅंकेत देणे आवश्यक आहे. म्हणजे बॅंक विमा हप्ता कपात करणार नाही.तसेच कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित बॅंकेत घोषणापत्र भरुन देणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्यांस अधिसूचित सिताफळ व मोसंबी फळपिकासाठी जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र पर्यंत विमा संरक्षण घेता येईल तसेच मृग बहारात सिताफळ व मोसंबी, लिंबू या फळपिक विम्याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. तरी या घटकांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, असे आवाहन आर.जी.गुंडिले तालुका कृषी अधिकारी यांनी सोयगाव तालुक्यात शेतकऱ्यांना केले आहे.



## फुलंब्रीत कृषी सेवा केंद्रातून बियाण्याची जास्तीच्या दराने होणारी विक्री थांबवावी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील कृषी सेवा केंद्रात चालकाकडून जास्तीच्या दराने बियाणे विक्री होत आहे तसेच शेतकऱ्यांना हवे ते बियाणे कृषी सेवा केंद्रातून दिले जात नाही त्यामुळे कपाशीच्या मुबलक साठा उपलब्ध करून जास्तीच्या दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष साईनाथ बेडके यांनी तहसीलदार डॉक्टर शितल राजपूत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे या मागणीचे दखल न घेतल्या संघटनेच्या वतीने आंदोलन केले जाणार असल्याचे साईनाथ बेडके यांनी सांगितले सदरील निवेदनाच्या प्रति गटविकास अधिकारी तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले आहे फुलंब्री तालुक्यात काही बियाण्याची त्यांचाही निर्माण करून जास्तीच्या दराने बियाणे विक्री केले जात असून यामुळे शेतकऱ्यांना जास्तीच्या दराने कपाशीचे बियाणे घ्यावे लागत आहे बियाण्याचा साठा उपलब्ध करून देण्यात यावा व जास्तीच्या दराने बियाणे विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष साईनाथ बेडके यांनी निवेदनाद्वारे केले आहे.




## दहावीतील गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ, राजीव डोंगरे व डॉ. विजया डोंगरे यांच्या स्पंदन प्रतिष्ठान च्या वतीने आरोहण अकॅडमी या शाळेत शहर व तालुक्यातील इयत्ता १०वीमध्ये विशेष गुणवता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम शुक्रवार रोजी संपन्न झाला. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहित करणारे वक्ते छत्रपती संभाजीनगरचे अंकुश दिगंबर शिंदे यांनी १० वी नंतर च्या शैक्षणिक वाटा वर उपस्थित विद्यार्थी व पालकांना करीअर घडविण्यासाठी मार्गदर्शन केले. डॉ.राजीव डोंगरे, डॉ.विजया डोंगरे, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत व आरोहण इंग्लिश शाळेच्या प्राचार्या श्रीमती बहारखान यांची उपस्थिती होती. डॉ.डोंगरे व शिक्षक सोनवणे यांनी समयोचित भाषणे केली. प्रस्ताविक बहारखांन, आभार कोल्हे यांनी मानले, या कार्यक्रमात पालक वर्ग व ग्रामीणभागातील पालक वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता. एस. एस. खिल्लारे, बढे, कल्पना मॅडम, सोनवणे यांनी सहभाग नोंदविला.

## १४ पिस्तुल, ८० जिवंत काडतुसे, २५ मॅगझीन जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मध्यप्रदेश राज्याच्या सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात ठाणे पोलिसांनी धाडसी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १४ देशी पिस्टल, २५ मेगझिन, ८० जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी ठाणे हद्दीत केलेल्या कारवाईनंतर ठाणे पोलिसांनी चिकाटीने पाठपुरावा करून ही कारवाई केली आहे. यापूर्वी मागील १ जून रोजी ठाण्याच्या राबोडी पोलिसांनी एकाला ठाण्यात जेरबंद केले होते. त्याच्याकडील गावठी पिस्टल जप्त करून चौकशीनंतर ठाणे पोलिसांनी संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा पोलीस हद्दीत कारवाई केली. त्यात वरीलप्रमाणे अग्निशस्त्रे व पूरक साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी ठाणे पोलिसांनी मध्यप्रदेशमधील दोघांना जेरबंद केले आहे. रमेश मिसरिया किराडे २५ वर्षे, मुन्ना अलवे (बारेला) ३४, दोन्ही राहणार पाचोरी, तालुका दात पहाडी, जिल्हा बऱ्हाणपूर, मध्यप्रदेश अशी आरोपींची नावे आहे. दरम्यान मध्यप्रदेशमधील दुर्गम घनदाट जंगलाने व्याप्त पचोरी व अन्य भाग अवैध शस्त्र निर्मिती व तस्करीचे केंद्र आहे. याला लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील टूनकी व अन्य भागांतून होणाऱ्या तस्करी व अवैध गुप्त वाहतुकीचे जाळे राज्यात पसरले आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# आष्टी पोलिसांवर जुगाऱ्यांचा हल्ला

## नागरिकांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह ?

आधुनिक केसरी न्यूज





**परतूर :** परतूर तालुक्यातील आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झन्ना मन्ना खेळणाऱ्या जुगाऱ्यानी छापा टाकायला आलेल्या पोलिसांवरच हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार परतूर तालुक्यातील रंगोपंत टाकळी येथे घडला आहे.याआधिच परतवाडी तांडा येथे एका हॉटेल मध्ये हॉयप्रोफाईल जुगार अड्ड्यावर प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक चैतन्य कदम यांच्या पथकाने छापा मारुन २३ जणांना अटक केली होती.त्याच्याकडून १९,१५,३४०/ चा मुद्देमाल जप्त करण्यात आले होते.दरम्यान ही कारवाई होती न होती की या रंगोपंत टाकळीतील कारवाईत पोलिस यंत्रणेवरच हात उचलण्याची हिंमत झाल्याने आष्टी पोलिस ठाण्यातर्गत गुन्हेगारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. परतुर तालुक्यातील आष्टी पोलिस ठाण्यात गेल्या काही दिवसांपासून दारू विक्री व अवैध धंद्याविरोधात विशेष मोहिम हाती घेण्यात आलेली आहे.त्यातर्गत मा उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सोमनाथ नरके कर्मचारी दिपक सोनुने, रानोजी पांढरे, सज्जन काकडे हे रंगोपंत टाकळी येथे कांहीं लोक जुगार खेळत असल्याच्या माहिती ठिकाणी बुधवारी रात्री ०८:००वाजता जाऊन छापा टाकला. त्यांचा राग आल्याने जुगाऱ्यानी या पोलिस पथकावरच हल्ला चढविला.पोलिसास झालेल्या हाणामारीत वरील तीन पोलिस कर्मचारी जख्मी आहेत.

आष्टी पोलीस कर्मचारी दिपक सोनुने, रानोजी पांढरे, सज्जन काकडे यांना गंभीर दुखापत या प्रकरणी १ ) अनिल मधुकर ठोंबरे २ ) कैलास उध्दव ठोंबरे ३ ) ऋषीकेश भाऊराव ठोंबरे ४ ) श्याम बाबादेव ठोंबरे ५ ) भाऊसाहेब महादेव ठोंबरे ६ ) उध्दव श्रीरंग ठोंबरे सर्व राहणार रंगोपंत टाकळी व इतर चार अनोळखी इसम यांनी गैर कायद्याची मंडळी जमवून सरकारी कामात अडथळा निर्माण करणे व कर्मचाऱ्यांना जिवंत जाऊ देऊ नका असे म्हणत शिवीगाळ करुन हातातील काठ्यांनी मारहाण करून जख्मी केल्या प्रकरणी दिपक सोनुने यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तर परिसरात आष्टी पोलिसांच्याच मदतीने सर्व प्रकारचे अवैद्य धंदे चालत असतात असे ग्रामस्थांमध्ये बोलले जात आहे आष्टी पोलीस ठाण्याच्या समोरूनच भर दिवसा अवैद्य देशी विदेशी दारू, अवैद्य वाळू, गांजा, तर मटक्याचे व जुगाराचे अड्डे लपून छापून सुरूच असल्याचं ही पाहायला मिळत आहे तर झालेला हल्ला आष्टी पोलिसांची मोठा लज्जास्पद असल्याचंही बोलल जात आहे.

# कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालयात पर्यावरण दिन

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** येथील कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. डब्ल्यू बी. शिरसाठ हे होते. विचार मंचावर प्रभारी प्राचार्य प्रा.के.डी.कदम व प्रमुख व्याख्याते डॉ. बी.सी.मोरे हे होते. पर्यावरण दिनानिमित्त बोलताना डॉ.बी. सी.मोरे म्हणाले की, या वर्षाचा 5 जून हा जागतिक पर्यावरण दिन शासनाच्या आदेशान्वये मिशन लाईफ लाईफस्टाइल फॉर एन्व्हायरमेंट अशा स्वरूपात महाविद्यालय मध्ये साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रो. डॉ. बी सी मोरे होते.त्यांनी याप्रसंगी प्लास्टिकच्या वापरा संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्लास्टिकचा वापर कमी केला पाहिजे प्लास्टिकचे जमिनीत लवकर विघटन होत नाही किंवा रिसायकल होत नाही. त्यासाठी आपण प्लास्टिकचा वापर कमीत कमी केला पाहिजे आणि त्या ऐवजी सुती पिशव्या किंवा इतर गोष्टी आपण वापरल्या पाहिजेत. प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणामध्ये समुद्रामध्ये टाकने चालू आहे. त्याच्यामुळे समुद्राच्या पाण्याचा सामूबदलत चाललेला आहे आणि म्हणून येत्या काही वर्षांमध्ये समुद्रामध्ये एकही मासा आपल्याला सापडणार नाही. त्यामुळे आपल्याला प्लास्टिकच्या संदर्भामध्ये जीवनपद्धतीमध्ये बदल करावा लागेल.

त्याचबरोबर मोठ्या प्रमाणामध्ये कीटकनाशकांचा व रासायनिक खताचा वापर जमिनीमध्ये वाढलेला आहे म्हणून जमीन बिघडत चाललेली आहे. जमिनीमध्ये असलेला पाणीसाठा हा सुद्धा विषारी होत चाललेला आहे. त्याच्यामुळे आपल्याला आपल्या समाजामध्ये बरेचशे कॅन्सरचे पेशंट बघायला मिळत आहेत आणि त्या संदर्भामध्ये आपल्याला कीटकनाशकांचा वापर आणि रासायनिक खताचा वापर कमीत कमी करून आपली जमीन आणि पाणी प्रदूषणापासून वाचवायची आहे. म्हणून त्यांनी ऑरगॅनिक फर्टीलायझर आणि प्लांट बेस पेस्टिसाइड वापरण्यासाठी प्रबोधन झाले पाहिजे अशी आशा व्यक्त केली. हवा, जमीन, पाणी यांच्या प्रदूषणासंदर्भामध्ये त्यांनी मार्गदर्शन केले. ह्या सर्व गोष्टी जर शुद्ध मिळाल्यात तरच आपल्या ह्या पृथ्वीवरती जीवसृष्टी आणि मनुष्य French हा जगू शकेल. अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ. डब्ल्युव बी.शिरसाठ यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार डॉ. वाय.एम. नांद्रे यांनी मांडले. कार्यक्रमाला डॉ. सतीश मस्के, डॉ. हर्षल गवळे प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




# शेतकऱ्यांना मोफत बियाण्यांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त शेतकऱ्यांना मोफत बियाण्यांचे वाटप केले जाणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्याबाबत जागृती करण्यासाठी तसेच लोकांना कमी किमतीत तृणधान्य उपलब्ध व्हावे म्हणून उत्पादन क्षेत्रात वाढ करण्याचा निर्णय झाला. त्याअंतर्गत जिल्ह्यात १ लाख ७ हजार १६० धान्य बियाणे पिशव्यांचे मोफत वाटप होणार आहे. तसेच 'क्रॉप कॅफेटेरीया' अंतर्गत ३ हजार ७८ पिशव्या दिल्या जाणार आहे. यातील उत्पादित धान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबाला वापरता येणार असून त्याच माध्यमातून बियाणे तयार करून पुढील वर्षासाठी त्याचा उपयोग घेता येणार आहे. खरीप हंगामात तृणधान्यात सर्वाधिक वाटप ज्वारीच्या बियाण्याचे होणार आहे. तसेच बाजरी, राळा, कोदो, राजगीरा, नाचनी याचे बियाणे मिळतील. बदलत्या जीवनशैलीत ज्वारी, बाजरी, नाचनी व भगर ही तृणधान्ये जेवनात समाविष्ट होणे आवश्यक झाले आहे. ह्र्‌द्यरोग, मधुमेह व पोटाच्या विकाराचे प्रमाण वाढले आहे. गव्हाचा वापर वाढला. गव्हापासून तयार होणारा मैदा व मैद्यापासून तयार होणारे ब्रेड, बिस्किट, केक यांचा वापर वाढला आहे. या पदार्थापासून पोटात तयार होणारा चिकटा हा रक्तवाहिण्यांमध्ये साठून विविध विकार उद्‌भवतात. या पार्श्वभूमीवर डॉक्टरसुद्धा तृणधान्याचा आहारात वापर करण्याची शिफारस करू लागले आहे. या धान्याचे लागवड क्षेत्र कमी झाल्याने ती वाढण्यासाठी बियाणे मोफत दिल्या जात असल्याचे कृषी अधिक्षक प्रभाकर शिवणकर यांनी नमूद केले.

# नांदेड येथील अक्षय भालेराव खुनाचा सी.आय.डी. मार्फत तपास करा

## आंबेडकरवादी संघर्ष समितीची विभागीय आयुक्ताकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** नांदेड जिल्हयातील मौजे बोंडार (हवेली) येथील अनुसूचित जातीचा तरुण अक्षय भालेराव यांच्या मारेकऱ्यांच्या घरावर बुलडोजर चालवा. मौजे बोंडार (हवेली), जि. नांदेड येथील अनुसूचित जातीचा तरुण अक्षय भालेराव याने गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्याने त्याचा राग मनामध्ये ठेवून सदर गावातील ९ व इतर सवर्ण मराठा समाजातील इसमांनी जातीयद्वेष भावनेतून दि. ०१/०६/२०२३ रोजी सायं. ७ ते ७.३० वाजेच्या दरम्यान खंजर व तलवारीने वार करुन त्याचा खुन केला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात आंबेडकरी समाजामध्ये तीव्र संताप असून असंतोष आहे. या असंतोषाचा कधीही उद्रेक होवू शकतो, याची शासन, प्रशासनाने गंभीर दखल घेवून गुन्हयातील समाविष्ट आरोपीतांविरुध्द कडक शासन करण्यात येवून त्यांना फाशीची शिक्षा होईल, अशा पध्दतीने तपास करण्यात यावा. सदरील घटना ही अमानवी असून मानवतेला काळीमा फासणारी आहे, त्याचा समितीच्या वतीने व आंबेडकरी समुहाच्या वतीने तिव्र निषेध करण्यात येत आहे. तसेच पुढील मागण्यांबाबत गांभिर्याने विचार करण्यात येवून तात्काळ निर्णय घेण्यात यावा. या मागणीचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) च्या वतीने मा. विभागीय आयुक्तांकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे. गणेश साळवे, योगेश उबाळे, मनोज शेजवळ, नीरज बनकर, देवा मिसाळ यांच्या सह्या आहेत. १) अक्षय भालेराव यांच्या मारेकऱ्यांच्या घरावर बुलडोजर चालवा व मारेकऱ्यांची मालमत्ता जप्त करा.
२) मा.मुख्यमंत्र्यांनी पिडीत कुटुंबियांची भेट घ्यावी.
३) मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी अक्षय भालेराव यांच्या खुन प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्विकारुन तात्काळ राजीनामा द्यावा.
४) संघटीतपणे कटकारस्थान रचून जातीय द्वेषातून अक्षय भालेराव याचा खुन केल्याबद्दल आरोपीतांविरुध्द कलम १२०(ब) लावण्यात यावे.
५) गुन्हेगाराला फाशीची शिक्षा होण्यासाठी विशेष वकीलाची नियुक्ती करण्यात यावी
६) सदर गुन्हयाचा तपास हा सिआयडी सीबीआय मार्फत करण्यात यावा. ७) पिडीत कुटूंबियास राज्य शासनाने रु.५० लाख रुपये आर्थिक मदत करावी.
८) पिडीत कुटूंबियातील एका सदस्याला शासन सेवेत सामावून घेण्यात यावे. ९) मौजे बोंडार (हवेली) जि. नांदेड हे गांव जातीयवादी घोषित करण्यात येवून शासकीय निधी बंद करण्यात यावा.
१०) सदर प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे.



करीता वरील मागण्यांबाबत गांभिर्यपूर्वक विचार करुन आरोपींताना कडक शासन करण्यात येवून पिडीत कुटूंबियांचे पुनर्वसन करण्यात यावे.

# आफळेबुवांचे विवाहयोग संदर्भात मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** संभाजीनगर येथे 27/28 मे मुलामुलींसाठी 'थेटभेट' उपक्रम यशस्वीपणे पार पडल्यानंतर, ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळाने खास पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी सन्माननीय डॉ चारूदत्त आफळे बुवांचे समुपदेशन/मार्गदर्शन ४ जुनला संभाजीनगर येथे ठेवले होते,जे खूप महत्वपूर्ण झाले. आफळेबुवांना मिळालेली डॉ ही पदवी,३ जुनचा त्यांचा वाढदिवस आणि शिवाय जागतिक पालकदिनाचे औचित्य ! हा सुवर्णयोग अनुभवण्यास मिळाला.

सन्माननीय डॉ चारूदत्त आफळे बुवा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. डॉ अनुपम टाकळकर यांनी आफळेबुवांचे स्वागत केले तर ब्रह्मसखी टीमने आफळे बुवांचा सत्कार केला.डॉ महेंद्रसिगं चौहान आणि. डॉ अनुपम टाकळकर यांचे स्वागत ब्रह्मसखी टीमने केले.

तसेच डॉ महेंद्रसिगं चौहान यांनी थॅलसेमिया याविषयी यथायोग्य मार्गदर्शन केले."आरोग्य कुंडली " विषयी माहिती दिली, तसेच डॉ अनुपम टाकळकर यांनीही योग्य मार्गदर्शन केले.

आफळेबुवांचे पालकांना विवाहयोग विषयक मार्गदर्शन अनुभवण्याचा योगायोग ब्रह्मसखी टीमच्या संचालिका नंदिनी ओपलकर, गीता सराफ, ज्योती कानोले, तृप्ती कुलकर्णी यांच्या आयोजनामुळे घडून आला.या कार्यक्रमास पालकांची संख्या ३०० च्यावर होती.आफळेबुवांचे मार्गदर्शन म्हणजे भुतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांचा विचार करत आयुष्याकडे कसे बघायचे अन विवाहयोग जुळवून आणण्यासाठी पालकांनी काय करायचे ? यावर मार्गदर्शन होते,जे आजच्या ब्राह्मण समाजासाठी फार उपयुक्त आहे. ब्राह्मण समाजाच्या जागृतीसाठी असे मार्गदर्शन नक्कीच उपयोगी ठरणार आहे.

पालकांचे प्रश्न अन त्यावर आफळे सरांनी केलेले मार्गदर्शन अंत्यंत स्तुत्य कार्यक्रम होता.यापुढेही ब्रह्मसखी टीम जमेल तसे असे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रयत्न करत राहील,असे टीम ब्रह्मसखी कडून सांगण्यात आले.



# नॅशनल अॅन्टी करप्शन क्राईम कंट्रोल ब्युरो अध्यक्षपदी सराटे

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** सामाजीक कार्यात आघाडीवर असलेल्या नॅशनल अॅन्टी करप्शन क्राईम कंन्ट्रोल ब्युरो संघटनेच्या महाराष्ट्र राज्य हरिदास कारभारी सराटे यांची खुलताबाद तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली यावेळी पोलीस प्रोटेक्शन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.अस्लम शेख यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले . याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष अस्लम शेख यांनी सांगितले की, लवकरच या संघटनेची खुलताबाद कार्यकारणी जाहीर करण्यात येईल. खुलताबाद तालुक्यामध्ये पूर्ण भ्रष्टाचार उघडकीस आणणे, पिडीत महिलांच्या तक्रारीवर जनजागृती करणे, विवीध कार्यालयात नागरिकांची विशेषतः महिलांची होणारी अडवणूक दूर होवुन महिलांची सरकारी कामे तातडीने व्हावीत या दृष्टीने प्रयत्नशील राहण्याची ग्वाही संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अस्लम शेख यांनी सांगितले.

# ममनापूर गावात सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील आ. प्रशांत बंब यांच्या शिफारशीनुसार डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गतममनापूर गावामध्ये 10 लक्ष रू सिमेंट रस्त्याचे भूमीपूजन सरपंच व ग्रामपंचायत सदस्य याच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, ग्रामपंचायत भडजी सरपंच बाबासाहेब वाकळे, ग्रामपंचायत सदस्य भानुदास जाधव, गणेश घोडके, सदस्य प्रवीण अक्कर, शोभाताई होळकर, जनाबाई होळकर, कृष्णा होळकर, बाबुराव होळकर, भाऊसाहेब होळकर, गणेश होळकर, योगेश होळकर, पंजाब होळकर, विजय होळकर, राजू होळकर, गजानन होळकर, सचिन होळकर, संदीप होळकर, गोकुळ होळकर आदी महिला व नागरिकाची उपस्थिती होती.





# फुलंब्रीत राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुळंब्री :** येथील नगरपंचायत कार्यालयात मंगळवारी बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण, श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक दिन छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून; तसेच अभिवादन करून साजरा करण्यात आला. माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे तालुकाध्यक्ष सुहास शिरसाट यांनी पुष्पहार अर्पण केला आणि यावेळी भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, शहराध्यक्ष युवा मोर्चा वाल्मीक जाधव, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, रवींद्र काथार, मनोज चिकटे, बाबासाहेब शिंगारे, संजय मोरे, सकाराम हापत, सुदर्शन काथार, गजानन तावडे, भरत कुदळे, अनेक उपस्थित होते.

# प्रवाशासोबत असभ्य व्यवहार करणारे एस. टी. वाहक मुंडे व निरीक्षक श्रावणे यांची चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** चिखली ( जि बुलढाणा )जाणाऱ्या प्रवाशासोबत गैरवर्तन करत खासगी एजंटाना हाताशी धरून बसमधून उतरवणारे एस. टी. वाहक वैजिनाथ मुंडे आणि सिडको बसस्थानकावरील वाहतूक निरीक्षक हिरालाल श्रावणे यांना निलंबित करावे अशा आशयाची तक्रार विभाग नियंत्रक यांच्याकडे दाखल करण्यात आली असून त्यानुसार या दोघा कर्मचाऱ्याची खातेनिहाय चौकशी सुरु झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की वाहक वैजिनाथ मुंडे यांनी सदर प्रवाशास लगेजपोटी अव्वाच्या सव्वा मागणी केली आणि मग्रुरीची भाषा केली. सदर प्रवाशाने लगेज आकारणी कशी व कोणत्या दराने केली व तक्रार पुस्तकाची मागणी केली असता वाहकाकडे तक्रार पुस्तक नव्हते. वाहकाने चालकास सांगून बस सिडको बस स्टॅन्डवर वापस नेली. तिथे कर्तव्यावर असलेले हिरालाल श्रावणे यांनीसुद्धा काहीएक चौकशी न करता बसस्थानक आवारात खासगी वाहनासाठी प्रवाशी हुडकणाऱ्या त्यांच्या परिचित एजंटांना व सुरक्षा रक्षक यांना बोलाविले आणि प्रवाशाच्या अंगावर धावले व सामान गाडीतून खाली फेकले व उतरून दिले. झालेला प्रकार अत्यंत निंदनीय असून यामुळे प्रवाशाच्या नैसर्गिक हक्काचे उल्लंघन तसेच आर्थिक नुकसानदेखील झाले असल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करून ताबडतोब वाहक मुंडे व सिडको स्थानकातील एस. टी. चे हिरालाल श्रावणे यांना निलंबित करावे अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी दाखल तक्रारीनुसार छत्रपती संभाजीनगर चे विभागीय वाहतूक नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर